वर्ष : 6 अंक: 06

16-30 सप्टेंबर, 2025 (विनामूल्य)

# न्यू इंडिया समाचार

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत
PM-JAY



## राष्ट्र सांगत आहे

## आयुष्मान भव :

विकसित भारताच्या लक्ष्याच्या दिशेने एक आरोग्य क्रांती ठरलेल्या आयुष्मान भारत योजनेने समावेशक आणि सार्वत्रिक आरोग्यसेवेला एक असे वैश्विक प्रारूप बनवले आहे, जिथे राष्ट्र स्वतः सांगत आहे - आयुष्मान भव:



ई-प्रतीसाठी
क्यूआर स्कॅन करा



# एकच मंत्र 'वोकल फॉर लोकल' एकच मार्ग 'आत्मनिर्भर भारत'

**'मन की बात' या कार्यक्रमाच्या माध्यमातून पंतप्रधान देशाच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक वयोगटाच्या लोकांशी जोडले गेले आहेत. बेटी-बचाओ, बेटी-पढाओ अभियान असो किंवा स्वच्छ भारत आंदोलन, खादीप्रती प्रेम असो किंवा निसर्गाबद्दल, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव असो किंवा अमृत सरोवर, 'मन की बात' मध्ये पंतप्रधानांनी ज्या गोष्टींचे आवाहन केले त्याचे लोकचळवळीत रुपांतर झाले. या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचे लक्ष्य साध्य करण्यासाठी आत्मनिर्भर भारताचा मार्ग अवलंबत वोकल फॉर लोकलचा मंत्र दिला. मन की बात, या कार्यक्रमाचा हा संपादित अंश ...**

- **एनडीआरएफ-एसडीआरएफ :** पावसाळ्यात नैसर्गिक आपत्ती देशाची परीक्षा पाहत आहेत. आपण पूर आणि भूस्खलनाचा कहर पाहिलेला आहे. जिथे कुठे आपत्ती उद्भवल्या तिथे आपल्या एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या जवानांनी आणि इतर सुरक्षा दलांनी दिवसरात्र मेहनत घेत लोकांचे जीव वाचवले.

- **आपत्तीमध्ये केलेल्या मदतीसाठी मनःपूर्वक धन्यवाद :** संकटाच्या या काळात सैन्यदल मदतीला धावून आले. स्थानिक लोक, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, प्रशासन सर्वांनीच संकटाच्या या काळात सर्व प्रकारचे प्रयत्न केले. कठीण काळात मानवतेला सर्वतोपरी ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाला मी मनःपूर्वक धन्यवाद देतो.

- **माझा देश बदलतोय :** जम्मू-काश्मीरमधल्या पुलवामातल्या एका स्टेडिअममध्ये विक्रमी संख्येने लोक एकत्र जमले होते. पुलवामातला पहिला दिवस-रात्र क्रिकेट सामना इथे खेळवला गेला. पूर्वी हे घडणे अशक्य होते, मात्र आता माझा देश बदलत आहे. पुलवामामध्ये रात्रीच्या वेळी हजारोंच्या संख्येने क्रिकेटचा आनंद घेणारे प्रेक्षक, हे दृश्य खरोखरच बघण्यासारखे होते.

- **जो खेळतो त्याचा विकास होतो :** 'एक भारत-श्रेष्ठ भारत'ची भावना, देशाची एकता, देशाच्या विकासासाठी खूप गरजेची आहे आणि निश्चितच खेळ यात महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणूनच मी म्हणतो, 'जो खेलता है, वो खिलता है." आपला देशही जितके सामने खेळेल तितका अधिक तो विकसित होईल.

- **युवांची डेटाबँक :** 'प्रतिभा सेतू' नावाचा एक डिजिटल मंच तयार करण्यात आला आहे. यात यूपीएससी परीक्षेच्या अंतिम गुणवत्ता यादीत समाविष्ट होऊ न शकलेल्या 10,000 हून अधिक प्रतिभावान युवांची डेटाबँक उपलब्ध आहे.

- **सौर भात गिरणी :** सौर ऊर्जेमुळे शेतकऱ्यांचे आयुष्यदेखील बदलत आहे. तेच शेत, तेच कष्ट, तेच शेतकरी पण आता मेहनतीचे फळ कितीतरी पट अधिक आहे. हा बदल घडत आहे सौर पंप आणि सौर भात गिरणीमुळे. आज देशातल्या अनेक राज्यांमध्ये शेकडो सौर भात गिरण्या सुरू झाल्या आहेत. या सौर भात गिरण्यांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नासोबतच त्यांच्या चेहऱ्यावरचे तेजही वाढले आहे.

- **विश्वकर्मा बंधू :** 17 सप्टेंबरला विश्वकर्मा जयंती आहे. हा दिवस आपल्या विश्वकर्मा बंधूंना समर्पित आहे, जे पारंपरिक शिल्प, कौशल्य आणि ज्ञान-विज्ञान अविरतपणे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचवतात. आपले सुतार, लोहार, सोनार, कुंभार, शिल्पकार,सुतार, गवंडी नेहमीच भारताच्या समृद्धीचा पाया राहिले आहेत. आपल्या या विश्वकर्मा बंधूंच्या मदतीसाठीच सरकारने विश्वकर्मा योजना सुरू केली आहे.

- **भारतीय संस्कृती :** कॅनडातल्या मिसीसागा येथे प्रभू श्रीरामांच्या 51 फूट उंच मूर्तीचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाबाबत लोकांमध्ये खूप उत्साह होता. रामायण आणि भारतीय संस्कृतीप्रतीचे हे प्रेम आता जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पोहोचत आहे.

- **वोकल फॉर लोकल :** स्वदेशीचा मंत्र कायम लक्षात ठेवायचा आहे. भेटवस्तू तीच जी भारतात तयार झालेली असेल, पोशाख तोच जो भारतात तयार झाला असेल, सजावट तीच जी भारतात निर्मित सामानातून झाली असेल, प्रकाशयोजना तीच जी भारतात निर्माण झुंबरांपासून केलेली असेल. जीवनाच्या गरजेतील प्रत्येक गोष्ट स्वदेशी हवी. अभिमानाने सांगा,'हे स्वदेशी आहे.' याच भावनेने आपल्याला पुढची वाटचाल करायची आहे. एकच मंत्र 'वोकल फॉर लोकल', एकच मार्ग 'आत्मनिर्भर भारत', एकच लक्ष्य 'विकसित भारत'.

मन की बात' संपूर्ण ऐकण्यासाठी \क्यूआर कोड स्कॅन करा.

न्यू इंडिया
# समाचार
वर्ष : 6, अंक : 06 | 16-30 सप्टेंबर, 2025


मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोषकुमार

सल्लागार संपादक
विभोर शर्मा

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवनकुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चंदन कुमार चौधरी

भाषा संपादन
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू)

मुख्य डिझायनर
श्याम तिवारी

वरिष्ठ डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
अभय गुप्ता
सत्यम सिंग



13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी क्लिक करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचारबद्दल ताजी माहिती जाणून घेण्यासाठी फॉलो करा: @NISPIBIndia

# आतील पानांवर ...

**मुखपृष्ठ कथा**

**आयुष्मान भारतची 7 वर्ष**

## निरोगी भारत विकसित भारताचा आधार

'तुमचे आरोग्य, आमचा संकल्प' हे ध्येय ठेवून 23 सप्टेंबर 2018 रोजी सुरू करण्यात आलेली नव्या जगाची सर्वात मोठी आरोग्य विमा योजना- आयुष्मान भारतला 7 वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्ताने जाणून घेऊया आरोग्य क्षेत्रात केंद्र सरकारचा पुढाकार कशा प्रकारे बनत आहे विकसित भारताचा भक्कम आधार... 10-27



**संसद: पावसाळी अधिवेशन 2025**

**राष्ट्र गौरव आणि विजयोत्सवाचे प्रतीक ठरले पावसाळी अधिवेशन**



संसदेच्या दोन्ही सदनात एकूण 15 विधेयके मंजूर .. 6-7

**पंतप्रधानांचा गया दौरा**

**बिहारच्या महानतेला उजाळा देत विकासाचा संदेश**



बिहारला 12 हजार कोटी रुपयांहून अधिक विकास कामांच्या भेटी | 28-30

वृत्त सारांश | 4-5

पदपथावरील विक्रेत्यांच्या स्वप्नांना पंख, पीएम स्वनिधी 2030 पर्यंत
केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पीएम स्वनिधीसह अनेक महत्त्वपूर्ण प्रस्ताव मंजूर | 8-9

आत्मनिर्भर भारत अभियानाची गती वाढवणारा गुजरात
पंतप्रधानांच्या दोन दिवसांच्या दौऱ्यात 5,400 कोटी रुपयांच्या प्रकल्पांची भेट | 31-33

कोलकाताच्या विकासाला मेट्रोची नवी चालना
पंतप्रधानांनी 3 नव्या मेट्रो रेल्वेमार्गांसह दिली 5,200 कोटी रुपयांच्या विकासकामांची भेट | 34-35

विकसित राष्ट्राचा आधार, आत्मनिर्भर भारत
ईटी वर्ल्ड लीडर्स फोरमला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले संबोधित | 36-37

भारतात क्रूज पर्यटनाची नवी पहाट
जलमार्गांच्या उपयोगाला चालना देण्यासह 'क्रूज भारत मिशन'चे यशस्वी 1 वर्ष | 38-39

गरिबीविरुद्ध गरिबांना बनवले योद्धा
पीएम जनधन योजनेच्या 11 वर्षानिमित्त विशेष लेख | 40-41

अणुऊर्जा क्षेत्रात प्रमुख स्तंभ बनण्याच्या दिशेने भारत
महत्त्वपूर्ण पाऊल... ज्यामुळे अणुऊर्जा क्षेत्राचे बदलले चित्र | 42-45

बिहारच्या राजकारणातील योगी
बिहारचे पहिले दलित मुख्यमंत्री भोला पासवान शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली | 48



**सदन हे लोकशाहीचे इंजिन**

विठ्ठलभाई पटेल हे मध्यवर्ती कायदेमंडळाचे निवडून आलेले पहिले भारतीय अध्यक्ष होण्याच्या घटनेला 100 वर्ष झाल्यानिमित्त विधानसभा अध्यक्षांचे संमेलन | 46-47

**प्रकाशक आणि मुद्रकः कंचन प्रसाद,** महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो) मुद्रण – चन्दु प्रेस, 469, पटपड़गंज इंडस्ट्रियल एस्टेट, दिल्ली-110092
**पत्रव्यवहार आणि ईमेल साठी पत्ता** – कमरा संख्या-1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नई दिल्ली-110003
**ईमेल** – response-nis@pib.gov.in आर. एन. आय. क्रमांक DELMAR/2020/78830

## संपादकाच्या लेखणीतून...

# उपचारांच्या सुविधांपासून कोणीही भारतीय वंचित राहू नये यासाठी

आदरपूर्वक नमस्कार.

संस्कृत महाकवी कालिदास यांनी रचलेल्या 'कुमारसंभवम्' महाकाव्यात लिहिले आहे- "शरीरमाद्यं खलुधर्मसाधनम्।" अर्थात शरीर हेच सर्व कार्य आणि कर्तव्यांची पूर्तता करण्याचे प्रथम साधन आहे. जेव्हा नागरिक निरोगी असतील, तेव्हाच राष्ट्र बलवान आणि सक्षम होईल. ही विचारसरणी आज भारताच्या आरोग्य क्रांतीचा आधार बनली आहे. सार्वत्रिक आरोग्यसेवेचे स्वप्न साकार होत आहे. यामध्ये, आयुष्मान भारत योजना सर्वात प्रभावी ठरली आहे. आज, गरिबातील गरीब व्यक्तीदेखील मोफत उपचारांच्या सुविधेचा लाभ घेत आहे. पूर्वी, उपचारांच्या खर्चामुळे, करोडो कुटुंब दरवर्षी दारिद्र्यरेषेखाली येत असत. जमीन आणि मालमत्ता विकावी लागत असे. परंतु आता आयुष्मान भारतसारख्या योजनांनी गरीब मध्यमवर्गीय कुटुंबांना आधार तर दिला आहेच, शिवाय त्यांना आत्मविश्वासही दिला आहे.

याचसोबत आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास आणि जिल्हा स्तरापर्यंत तृतीयक स्तराच्या आरोग्य सुविधांची उपलब्धता, वैद्यकीय महाविद्यालये आणि जागांचा विस्तार, लसीकरण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेवर लक्ष केंद्रित करणे, यांमुळे आरोग्य क्षेत्राला एक नवीन दिशा तर मिळत आहेच, तसेच विकसित भारतात सर्वांसाठी आरोग्यसेवेचा पायादेखील तयार केला जात आहे. या 23 सप्टेंबर रोजी आयुष्मान भारत योजनेला 7 वर्ष पूर्ण होत आहेत आणि याच संदर्भात भारताची आरोग्य क्रांती हीच आपल्या या वेळच्या अंकाची मुखपृष्ठ कथा बनली आहे.

या व्यतिरिक्त व्यक्तिमत्त्व या मालिकेत बिहारचे पहिले दलित मुख्यमंत्री भोला पासवान शास्त्री यांच्या जीवनकार्याला उजाळा देण्यात आला आहे. प्रमुख योजनांमध्ये क्रूज भारत मिशनच्या वर्षपूर्तीचा आढावा आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, संसदेच्या पावसाळी अधिवेशनात झालेल्या कामकाजाचा लेखाजोखा, यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पंधरवड्यातील कार्यक्रम समाविष्ट आहेत.

याचसोबत विठ्ठलभाई पटेल हे केंद्रीय कायदेमंडळाचे पहिले निवडून आलेले भारतीय अध्यक्ष होण्याच्या घटनेला 100 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त दिल्ली विधानसभेत आयोजित कार्यक्रम, अणुऊर्जा क्षेत्रात प्रमुख आधारस्तंभ होण्याच्या भारताच्या लक्ष्यासंदर्भात विशेष लेख, यासह अंकाच्या मुखपृष्ठाच्या आतील भागावर मन की बात आणि मलपृष्ठावर, खाद्यतेलाचे सेवन 10% कमी करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाचा विशेष मजकूरदेखील समाविष्ट करण्यात आला आहे.

आपण आपल्या सूचना आम्हाला पाठवत रहा.



(धीरेंद्र ओझा)

हिंदी, इंग्रजी तसेच इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध पत्रिका वाचा/डाउनलोड करा.

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# आपले मनोगत




### सरकारी योजनांविषयी जाणून घेण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी योग्य मासिक

न्यू इंडिया समाचार या नियतकालिकात सरकारी योजनांबद्दल जाणून घेण्यासाठी आणि त्या समजून घेण्यासाठी योग्य माहिती उपलब्ध असते. या नियतकालीकातील आकडेवारी आणि तथ्यांमधून अगदी अचूक माहिती मिळते. जर या नियतकालिकात वाचकांच्या टीकात्मक लेखांसाठी, विचारांसाठी आणि सूचनांनाही योग्य वाव उपलब्ध करून दिला, तर हे नियतकालिक आणखी चांगले होऊ शकते असे मला वाटते.

profgvramana@gmail.com

### युवा वर्गाला ज्ञानवर्धक मजकुरासोबत जोडून घेण्यासाठी उपयुक्त

मी न्यू इंडिया समाचार या नियतकालिकाचा नियमित वाचक आहे. समाज माध्यमांच्या युगात, युवा वर्गाला ज्ञानवर्धक सामग्रीशी जोडून घेण्यात न्यू इंडिया समाचार हे नियतकालिक मदतीचे ठरत असल्याचे मला वाटते. या नियतकालिकाच्या माध्यमातून आम्ही देशाच्या विकासाची एक नवी दिशा पाहू शकतो. तुमचा प्रत्येक अंक आमच्या जागरूकता अभियानांसाठी खूप उपयुक्त ठरतो.

yshrivastava2008@gmail.com

### विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त, हे नियतकालिक मी आवर्जून वाचतो

माझ्या ग्रामपंचायतीत येणाऱ्या न्यू इंडिया समाचार या नियतकालिकातील प्रत्येक लेख मी आवर्जून वाचतो. हे नियतकालिक विद्यार्थ्यांसाठी खूप उपयुक्त आहे. या नियतकालिकात मला जम्मू - काश्मीर आणि लडाखच्या विकासासाठी केल्या जात असलेल्या कामांबद्दल वाचायला मिळाले. कलम 370 हटवल्यानंतर जम्मू - काश्मीर आणि लडाखमधील रस्ते, सिंचन, आरोग्य, शिक्षण आणि पर्यटन क्षेत्रात झालेल्या प्रगतीबद्दल मला माहिती मिळाली. तिथे कायदा - सुव्यवस्थेत कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी उचललेल्या पावलांबद्दलही नियतकालिकात उत्कृष्ट पद्धतीने सांगितले गेले आहे.

prasadpagadala631@gmail.com

### न्यू इंडिया समाचार या नियतकालिकाचा आभारी

ज्ञानवृद्धी आणि आत्म-विकासासाठी वाचन हा माझ्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. मला नियमितपणे रोजगार समाचारसारखी कोणतेही सरकारी नियतकालिक आणि सरकारी वृत्तपत्र वाचायला आवडते. याच मालिकेत न्यू इंडिया समाचार या नियतकालिकाच्या माध्यमातून सरकारी योजना, माहिती आणि इतर अनेक विषयांवरची माहिती मिळते. न्यू इंडिया समाचार या नियतकालिकात प्रकाशित माहिती आशयघन आणि विस्तृत स्वरुपातील असते. मी न्यू इंडिया समाचार या नियतकालिकाचा आभारी आहे.

maheshwarisocietyms@gmail.com

### विद्यार्थी, ज्येष्ठ आणि ज्ञानाची आसक्ती असलेल्या लोकांसाठी उत्कृष्ट

न्यू इंडिया समाचार हे नियतकालिक विद्यार्थी, ज्येष्ठ आणि ज्ञानाची आसक्ती असलेल्या लोकांसाठी व्यापक, ज्ञानवर्धक आशय सामग्री उपलब्ध करून देण्याचे महत्वाचे काम करत आहे. हे देशासाठीचे एक सर्वोत्तम काम आहे. एक विद्यार्थी म्हणून, मला न्यू इंडिया समाचार हे नियतकालिक खूप आवडते.

rahulsuthar2580@gmail.com

पत्रव्यवहार आणि ईमेल साठी पत्ता कक्ष क्र. 1077,
सूचना भवन , सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली 110003
ई-मेल- response-nis@pib.gov.in

न्यू इंडिया समाचार
आकाशवाणीवर ऐकण्यासाठी
क्यू आर कोड स्कॅन करा

वृत्त सारांश



# पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजने अंतर्गत नोंदणी करा

## 3.5 कोटींपेक्षा जास्त नोकऱ्यांची निर्मिती होणार;

## सरकार प्रोत्साहनपर लाभ निधी देणार

लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेली घोषणा असो किंवा सर्वसाधारण अर्थसंकल्पातील, केंद्र सरकारच्या बदललेल्या कार्य-संस्कृतीमुळे ती प्रत्यक्षात येत असल्याचे देशाने पाहिले आहे. यंदाच्या 15 ऑगस्टला पंतप्रधान मोदी यांनी युवा वर्गाला रोजगार देणाऱ्या पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजनेच्या नोंदणीला सुरुवात करण्याची घोषणा केली आणि तिसऱ्याच दिवशी 18 ऑगस्टला त्यासाठीचे पोर्टल देखील सुरू करण्यात आले. या योजनेअंतर्गत 3.5 कोटींपेक्षा जास्त नोकऱ्यांची निर्मिती होईल अशी अपेक्षा आहे, यासाठी सरकारकडून प्रोत्साहनपर लाभ निधी दिला जाणार आहे. सर्व क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासोबतच रोजगार क्षमता आणि सामाजिक सुरक्षेचा विस्तार करणे हा या योजनेचा उद्देश आहे. याअंतर्गत मोठ्या संख्येने नोकऱ्या निर्माण होतील आणि यासाठी सरकार केवळ नोकरी मिळवणाऱ्यांनाच नव्हे, तर नोकरी देणाऱ्या नियोक्त्यांनाही आर्थिक प्रोत्साहनपर लाभ देणार आहे. 1 ऑगस्ट 2025 ते 31 जुलै 2027 दरम्यान निर्माण झालेल्या नोकऱ्यांसाठी या योजनेचा लाभ मिळणार आहे. यासाठीची नोंदणी ही



पोर्टलवर (https : //pmvbry.epfindia.gov.in किंवा https : //pmvbry.labour.gov.in) वर केली जाऊ शकते. या योजनेंतर्गत नव्याने नियुक्त झालेल्या तरुणांना दोन हप्त्यांमध्ये 15 हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ निधी, तर नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करणाऱ्या नियोक्त्यांना प्रति नवीन कर्मचाऱ्यासाठी 3,000 रुपये प्रति महिना पर्यंत प्रोत्साहनपर लाभ निधी दिला जाईल.

## शिक्षकांची संख्या एक कोटीच्या पलिकडे, गळतीच्या दरातही घट

शिक्षकांची संख्या वाढवून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे वातावरण निर्माण करणे आणि विद्यार्थी - शिक्षक गुणोत्तर तर्कसंगत बनवण्याच्या प्रयत्नांमुळेच शैक्षणिक वर्ष 2024 - 25 मध्ये पहिल्यांदाच शिक्षकांची संख्या एक कोटीच्या पलिकडे पोहोचली आहे. 2022 - 23 च्या तुलनेत हे प्रमाण सुमारे 7 टक्क्यांनी वाढले आहे. यूडीआईएसई प्लस अर्थात शिक्षण क्षेत्रासाठी एकीकृत जिल्हा माहिती प्रणाली सुरू झाल्यापासून, कोणत्याही शैक्षणिक वर्षात पहिल्यांदाच ही आकडेवारी ओलांडली असल्याचे शिक्षण मंत्रालयाच्या अहवालात आहे. यामुळे विद्यार्थी - शिक्षक गुणोत्तर आता मूलभूत स्तरावर 10, प्रारंभिक स्तरावर 13, मध्यम स्तरावर 17 आणि माध्यमिक स्तरावर 21 इतके झाले आहे. हे प्रमाण नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिफारस केलेल्या 1 : 30 या गुणोत्तरापेक्षा खूप चांगले आहे. त्याचवेळी, शैक्षणिक वर्ष 2024 - 25 मध्ये 2022 - 23 आणि 2023 - 24 या मागील दोन वर्षांच्या तुलनेत प्रारंभिक, मध्यम आणि माध्यमिक स्तरांवरील शाळा सोडून जाण्याच्या दरातही लक्षणीय घट झाली आहे.

प्रारंभिक टप्प्यात, हा दर मागील वर्षाच्या तुलनेत 3.7% वरून 2.3% पर्यंत खाली आला आहे, तर मध्यम टप्प्यात 5.2% वरून 3.5 टक्के इतका कमी झाला आहे आणि माध्यमिक स्तरावर तो 10.9 वरून तो 8.2% इतका खाली आला आहे.



# 7 वर्षांत दुप्पट झाला महिलांच्या रोजगाराचा दर



केवळ महिलांचे उत्थानच नाही, तर महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाच्या दृष्टिकोनामुळे गेल्या 11 वर्षांत देशाने महिलांशी संबंधित प्रत्येक क्षेत्रात क्रांतिकारी बदल पाहिले आहेत. विकसित भारताच्या संकल्प यात्रेच्या वाटचाली अंतर्गत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2047 पर्यंत देशाच्या कार्यरत मनुष्यबळात महिलांचा 70% इतक्या प्रमाणातील सहभाग सुनिश्चित करण्याचे उद्दिष्टही समोर ठेवले आहे. या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत, परिणामी देशात महिलांच्या रोजगाराचा दर वाढून दुप्पट झाला आहे. कामगार मंत्रालयाच्या श्रमबल या नियतकालिन सर्वेक्षणानुसार, आर्थिक वर्ष 2017 - 18 मध्ये महिलांचा रोजगार दर 22% होता, त्यात 2023 - 24 मध्ये वाढ होऊन तो 40.3% इतका झाला. म्हणजेच केवळ सात वर्षांत हा दर जवळजवळ दुप्पट झाला आहे. याच काळात ग्रामीण भागातील महिलांच्या रोजगारात 96% इतकी, तर शहरी भागातील महिलांच्या रोजगारात 43% इतकी वाढ दिसून आली आहे. महिला पदवीधरांची रोजगार क्षमता देखील 2013 मधील 42% वरून वाढून 2024 मध्ये 47.53% इतकी झाली आहे. पदव्युत्तर आणि त्याहीपेक्षा जास्त शिक्षण घेतलेल्या महिलांमधील रोजगाराचा दर 2017 - 18 मधील 34.5% वरून वाढून 2023 - 24 मध्ये 40% इतका झाला आहे. इतकेच नाही, तर राष्ट्रीय पातळीवर 15 मंत्रालयांच्या 70 केंद्रीय योजना आणि 400 पेक्षा जास्त राज्यस्तरीय योजनांच्या माध्यमातून महिला उद्योजकतेला प्रोत्साहन दिले जात असून, त्याचेही अत्यंत सकारात्मक परिणाम समोर आले आहेत. महिलांचा स्वयंरोजगाराचा दर 2017 - 18 मध्ये 51.9% इतका होता, 2023 - 24 मध्ये त्यात वाढ होऊन तो तब्बल 67.4% इतका झाला आहे.

**महिलांचा रोजगार वाढला...**

ग्रामीण **96%**

शहरी क्षेत्र **43%**

महिला पदवीधरांची रोजगार क्षमता देखील 2013 मधील 42% वरून 2024 मध्ये 47.53% इतकी झाली आहे.

# आता शाळांमध्ये शिबिरे लावून मुलांचे आधार अद्ययावत केला जाईल



आता विद्यार्थ्यांकरता स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षणाच्या प्रवेशाची प्रक्रिया सोयीस्कर व्हावी यासाठी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (युआयडीएआय) या आधार कार्ड क्रमांक जारी करणाऱ्या संस्थेने एक मोठे पाऊल उचलले आहे. सद्यस्थितीत देशात 5 - 15 वर्ष या वयोगटाअंतर्गत ज्यांचे आधार बायोमेट्रिक अद्ययावत करणे अद्यापही बाकी आहे अशा मुलांची संख्या 17 कोटी इतकी आहे. अशा परिस्थितीत, युआयडीएआयने शालेय साक्षरता विभागासोबतच्या भागिदारीअंतर्गत पाऊल उचलले आहे. याअंतर्गत मुलांचे आधार अद्ययावत करण्यामधील अडचण दूर करण्यासाठी तसेच अनिवार्य बायोमेट्रिक अद्ययावतीकरणाची स्थिती एकीकृत जिल्हा माहिती प्रणाली शिक्षण प्लस (युडीआयएसई+) या ॲप्लिकेशन वर उपलब्ध करून दिली जाईल. यामुळे कोट्यवधी विद्यार्थ्यांना अनिवार्य बायोमेट्रिक अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध होईल. या अद्ययावतीकरणासाठी शाळांमध्ये शिबिरांचे आयोजन केले जाईल. आधार कार्डासोबत बायोमेट्रिक अद्ययावत केल्यामुळे विद्यार्थ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेताना, तसेच नीट , जेईई, सीयूईटी यांसारख्या स्पर्धा परीक्षा आणि विद्यापीठ परीक्षांच्या नोंदणीसाठी प्रमाणीकरण करताना आता कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार नाही.

# आदि कर्मयोगी अभियानाच्या माध्यमातून आदिवासी भागांच्या कायापालटाची तयारी

भारताचा आदिवासी समुदाय एका दीर्घकालीन वारशासोबत देशाच्या सांस्कृतिक ओळखीचा मूक संरक्षक बनून राहिला आहे. गेल्या 11 वर्षांत धोरणात्मक लक्ष दिल्या नंतरही, अजूनही विशेषत्वाने लक्ष देण्याची गरज असलेले अनेक आदिवासी भाग अस्तित्वात आहेत. 2047 पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र सरकार आता युद्ध पातळीवर या भागांचे सशक्तीकरण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. याच मालिकेअंतर्गत केंद्रीय आदिवासी व्यवहार मंत्रालयाने आदि कर्मयोगी अभियानाचा प्रारंभ केला आहे. हा जगातील सर्वात मोठ्या आदिवासी मूलभूत नेतृत्व कार्यक्रमाच्या स्वरुपातील या अभियानाच्या मुळाशी 20 लाख प्रशिक्षित, प्रेरित आणि मोहिमेसाठी कार्यकर्त्यांचे एक पथक तयार करण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य सरकारने बाळगले आहे. हे पथक 30 राज्ये / केंद्रशासित प्रदेशांमधील 1 लाखापेक्षा जास्त आदिवासीबहुल गावांमध्ये आणि तिथल्या 10.5 कोटींपेक्षा जास्त आदिवासी नागरिकांपर्यंत पोहोचतील आणि त्यांचा उत्थान घडवून आणण्याचे काम करतील. या अभियानांतर्गत राज्यस्तरीय प्रशिक्षकांच्या प्रशिक्षकांसाठी मानकीकृत प्रयोगशाळांसह राज्य, जिल्हा आणि ब्लॉक स्तरावरील प्रशिक्षित प्रशिक्षकांची परिसंस्था उभारली जात आहे. हे प्रशिक्षक समुदायांना संघटित करण्यासोबतच पीएम - जनमन, धरती आबा आदिवासी ग्राम उत्कर्ष अभियान आणि राष्ट्रीय सिकल सेल निर्मूलन मिशन यांसारख्या उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासह, या भागांशी संबंधित माहितीसाठा संकलित करतील.

ऑपरेशन सिंदूर आणि अंतराळातील कामगिरीवरील चर्चा

# देशाचा गौरव आणि विजयोत्सवाचे प्रतीक ठरले पावसाळी अधिवेशन

**ऑपरेशन सिंदूर आणि आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पहिल्यांदा तिरंगा फडकवणारे शुभांशु शुक्ला यांच्या यशस्वी मोहिमेनंतर आयोजित संसदेचे पावसाळी अधिवेशन देशासाठी विजयोत्सवाचे प्रतिक ठरले. संसदेचे पावसाळी अधिवेशन 21 जुलै ते 21 ऑगस्ट या कालावधीपर्यंत चालले, या अधिवेशनात विशेषत्वाने या दोन्ही विषयांवर अभिमानास्पद चर्चा झाली. या अधिवेशनाच्या काळात एकीकडे लोकसभेत 14 विधेयके सादर केली गेली आणि 12 विधेयके मंजूर झाली, तिथे दुसरीकडे राज्यसभेत एकूण 15 विधेयके मंजूर झाली. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये एकूण 15 विधेयके मंजूर झाली...**



संसद म्हणजे लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर. दरवर्षी तीन अधिवेशने (अर्थसंकल्पीय, पावसाळी, हिवाळी) आयोजित केली जातात. पण यावेळी एक महिनाभर चाललेले संसदेचे पावसाळी अधिवेशन देशाच्या विजयाच्या उत्सवाचे, देशाच्या अभिमानाचे, भारताच्या लष्करी सामर्थ्याचे, भारताच्या नवीन संरक्षण धोरणाचे आणि भारताच्या आत्मनिर्भरतेचे साक्षीदार बनले. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरुद्ध भारताच्या शौर्य, पराक्रम आणि सामर्थ्याचे प्रतीक ठरलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या यशावर आणि आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात भारताचा तिरंगा फडकवल्यानंतर शुभांशु शुक्ला हे पृथ्वीवर सुरक्षित परतल्याच्या घटनेवर संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विशेष चर्चा झाली. या चर्चेतून भविष्यातील भारताची सोनेरी प्रतिमा देशासमोर साकारली.

नव्या भारताच्या विजयोत्सवाचा जयघोष संसदेच्या दोन्ही सभागृहांत झाला आणि देशासोबतच जगानेही पुन्हा एकदा भारताची लष्करी शक्ती - सामर्थ्य अनुभवले. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्याने आपले उद्दिष्ट शंभर टक्के साध्य केले आणि दहशतवाद्यांच्या म्होरक्यांच्या घरात जाऊन केवळ 22 मिनिटांत त्यांना जमीनदोस्त केले. या ऑपरेशनच्या माध्यमातून जगाला भारताच्या संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेचे आणि भारतीयत्वाने भरलेल्या लष्करी सामर्थ्याच्या नवीन रूपाचे दर्शन घडले.

# अडथळ्यांनंतर ही... कामगिरीसह ऐकू आला धोरणांचा आवाज

**18 वी लोकसभा | पाचवे अधिवेशन**

सभागृहात ऑपरेशन सिंदूर आणि भारताच्या अंतराळ कार्यक्रमाच्या कामगिरीवर विशेष चर्चा झाली.

- राज्यसभेत एकूण 15 विधेयके मंजूर झाली. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी एकूण 15 विधेयके मंजूर केली.
- लोकसभेत 14 सरकारी विधेयके सादर झाली, 12 विधेयके मंजूर झाली.

**37** तास, केवळ इतकेच कामकाज झाले, त्याचवेळी कामकाजासाठीचा निश्चित केलेला कालावधी 120 तासांचा होता.

- अडथळ्यांमुळे, लोकसभेच्या कामकाजाच्या यादीत समाविष्ट 419 प्रश्नांपैकी केवळ 55 तारांकित प्रश्नांचीच तोंडी उत्तरे दिली जाऊ शकली.

देशाने एका सुरात भारतीय सैन्याच्या पराक्रमाचा उत्सव साजरा केला. या विशेष चर्चेवर लोकसभेत स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उत्तर दिले. मी भारताची बाजू मांडण्यासाठी उभा राहिलो आहे असे ते म्हणाले. संकल्पशक्तीने भारलेले त्यांचे हे शब्द 140 कोटी नागरिकांच्या दृष्टिकोनाचे सूचक बनले आहेत. इतकेच नाही, तर अंतराळात भारताच्या नव्या उड्डाणाचे प्रतीक बनलेल्या शुभांशु शुक्ला यांच्या परतीच्या घटनेनेही संसदेच्या पावसाळी अधिवेशनात वर्चस्व गाजवले. विज्ञान - तंत्रज्ञान, नवोन्मेषाबाबत नवा उत्साह आणि उमेद जागवणाऱ्या या यशस्वी वाटचालीचा उत्सव देशाने साजरा केला.

तरीही, पावसाळी अधिवेशनादरम्यान काही इतर मुद्द्यांच्या बाबतीत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षात गदारोळ झाल्याचेही दिसले, त्यामुळे लोकसभेत एकूण 120 तासांपैकी केवळ 37 तासच चर्चा होऊ शकली तर, राज्यसभेतही केवळ 41 तास 15 मिनिटेच चर्चा झाली. अंतराळ स्थानकावरील भारताचा पहिला अंतराळ वीर - 2047 पर्यंत विकसित भारताच्या वाटचालीतील अंतराळ कार्यक्रमाची महत्त्वाची भूमिका यावर विशेष चर्चा देखील 18 ऑगस्टला लोकसभेत सुरू झाली होती, पण सभागृहातील सततच्या अडथळ्यांमुळे ती पूर्ण होऊ शकली नाही. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आपल्या समारोपीय भाषणात लोकसभेचे अध्यक्ष ओम बिरला यांनी सभागृहातील गदारोळाबद्दल वेदनाही व्यक्त केली. लोकशाहीत जनतेला आपल्या प्रतिनिधींकडून असलेल्या अपेक्षांचा उल्लेख त्यांनी केला. नागरिकांच्या आकांक्षांची पूर्तता करण्यासाठी सदस्यांनी सभागृहात आपल्या वेळेचा सदुपयोग जनहिताच्या समस्या, मुद्दे आणि महत्त्वाच्या विधेयकांवरील गंभीर आणि अर्थपूर्ण चर्चेसाठी केला पाहिजे असे ते म्हणाले.

निःसंशयपणे, हे पावसाळी अधिवेशन, विशेषतः ऑपरेशन सिंदूर आणि अंतराळातील भारताच्या विराट कामगिरीच्या विजयोत्सवाचे प्रतीक ठरले. या काळात देशाच्या विकासाच्या वाटचालीला बळ देणारी, नागरिकांना सामर्थ्य देणारी अनेक विधेयकेही मांडली गेली, काही मंजूर देखील झाली, काही संसदेच्या समित्यांकडे पाठवली गेली. मात्र, काही इतर मुद्द्यांच्या बाबतीत अडथळेही निर्माण झाले. म्हणूनच सहमती आणि असहमती असणे ही लोकशाहीची नैसर्गिक प्रक्रिया आहे पण, सामूहिक प्रयत्नांतून सभागृह प्रतिष्ठा, सन्मान आणि सभ्यतेने चालावे ही देशाची अपेक्षा आहे, लोकशाहीच्या सर्वोच्च संस्थेतून आपल्या नागरिकांना काय संदेश दिला जात आहे, याचे राजकीय पक्ष आणि खासदारांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे असा संदेश लोकसभेच्या अध्यक्षांनी आपल्या आसनावरून दिला -

## जेव्हा पंतप्रधान मोदी लोकसभेत म्हणाले....

करा चर्चा आणि इतकी करा, करा चर्चा आणि इतकी करा,की शत्रू दहशतीने हादरून जावा, शत्रू दहशतीने हादरून जावा,ध्यानी असू दे केवळ इतकेच, ध्यानी असू दे केवळ इतकेच,सिंदूर आणि सेनेचा मान प्रश्नांमध्येही अढळ राखला जावा. जर हल्ला झाला भारत मातेवर, तर जोरदार वार करावा लागेल,शत्रूचा ठावठिकाणा कुठेही असो, आपल्याला भारतासाठीच जगावे लागेल.

## जेव्हा लोकसभा अध्यक्ष ओम बिरला म्हणाले....

आज आपण सभागृहात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील भारताचा पहिला अंतराळवीर - 2047 पर्यंत विकसित भारताच्या वाटचालीतील अंतराळ कार्यक्रमाची महत्त्वाची भूमिका या विषयावर चर्चा करत आहोत. सभागृह या ऐतिहासिक क्षणी वायुसेनेचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचे हार्दिक अभिनंदन करते. त्यांची अंतराळ मोहीम आणि यशस्वी परत आल्यामुळे केवळ एका मोहिमेला यश मिळालेले नाही, तर 140 कोटी भारतीयांसाठी तो अभिमान आणि प्रेरणेचा स्रोत ठरला आहे. ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांची ही कामगिरी आपल्या युवा वर्गासाठी मोठी प्रेरणा आहे. आज भारताच्या अंतराळ कार्यक्रमाचे वैज्ञानिक श्रेष्ठत्व, वेगळेपण आणि विश्वासार्हता यामुळे संपूर्ण जगात आपले विशेष अस्तित्व निर्माण झाले आहे.




### केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय

# पदपथ विक्रेत्यांच्या स्वप्नांना उभारी

## पीएम स्वनिधी 2030 पर्यंत

कोविडच्या जागतिक आव्हान काळात 1 कोटींहून अधिक पदपथ विक्रेत्यांच्या उपजीविकेचा आधार बनलेल्या पीएम स्वनिधी योजनेने स्वयंरोजगाराच्या संकल्पनेला एक नवीन आयाम दिला आहे. त्याचे सुखद आणि उत्साहवर्धक परिणाम लक्षात घेऊन, केंद्र सरकारने या क्रांतिकारी योजनेची पुनर्रचना करून तिला मार्च 2030 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या कल्याणासाठी पूर्णपणे कटिबद्ध असलेल्या केंद्र सरकारची ही योजना फेरीवाल्यांसाठी केवळ आर्थिक मदतच नाही तर त्यांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढवणारे पाऊल असल्याचे सिद्ध होत आहे. यासोबतच, केंद्रीय मंत्रिमंडळाने इतर अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांनाही मंजुरी दिली आहे...

**निर्णय:** पीएम स्ट्रीट व्हेंडर्स आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेची पुनर्रचना करून तिला 31 मार्च 2030 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**परिणाम:** या योजनेचा एकूण खर्च 7,332 कोटी रुपये आहे. 50 लाख नवीन लाभार्थ्यांसह 1.15 कोटी लाभार्थ्यांना लाभ देण्याचा पुनर्गठित योजनेचे उद्दिष्ट आहे. पदपथ विक्रेत्यांच्या उपजीविकेत ती मदतगार ठरेल.

- ही योजना पदपथ विक्रेत्यांना डिजिटली सक्षम, सामाजिकदृष्ट्या सुरक्षित आणि व्यावसायिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनवेल.
- पुनर्गठित योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे पहिला हप्ता सध्याच्या 10,000 रुपयांवरून 15,000 रुपये आणि दुसरा हप्ता 20,000 रुपयांवरून 25,000 रुपये करणे. तिसरा हप्ता पूर्वीप्रमाणेच 50,000 रुपयांचा असेल.
- 30 जुलै 2025 पर्यंत, 68 लाखांहून अधिक पदपथ विक्रेत्यांना 13,797 कोटी रुपये किमतीची 96 लाखांहून अधिक कर्जे वितरित करण्यात आली आहेत.
- सुमारे 47 लाख डिजिटली सक्रिय लाभार्थ्यांनी 6.09 लाख कोटी रुपयांचे 557 कोटींहून अधिक डिजिटल व्यवहार केले आहेत, ज्यामुळे त्यांना एकूण 241 कोटी रुपयांचा कॅशबॅक मिळाला आहे.
- 'स्वनिधी से समृद्धी' उपक्रमांतर्गत, 3,564 शहरी स्थानिक संस्थांमधील 46 लाख लाभार्थ्यांचे प्रोफाइल तयार करण्यात आले आहेत.

**निर्णय: कर्नाटक, तेलंगणा, बिहार आणि आसामला फायदेशीर 3 प्रकल्पांचे मल्टी ट्रॅकिंग आणि गुजरातमधील कच्छच्या दुर्गम भागांना जोडण्यासाठी नवीन रेल्वे मार्गाला मंजुरी**

**परिणाम:** रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे 12,328 कोटी रुपये एकूण खर्चाच्या चार प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पातील पहिला: देशलपार- हाजीपीर- लूना आणि वायोर- लखपत नवीन मार्ग, दुसरा: सिकंदराबाद (सनथनगर)- वाडी, तिसरा: भागलपूर-जमालपूर तिसरी मार्गिका आणि चौथा: फुर्केटिंग-न्यू तिनसुकिया दुपदरीकरण यांचा समावेश आहे.

- प्रवासी आणि मालाची अविरत आणि जलद वाहतुकीची खातरजमा करण्याचा या प्रकल्पांचा उद्देश आहे. हा उपक्रम कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याबरोबरच प्रवास सुविधा सुधारून लॉजिस्टिक्स खर्च कमी करेल.
- या निर्णयामुळे तेल आयातीवरील अवलंबित्व कमी होईल आणि कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन देखील कमी होईल.
- या प्रकल्पांमुळे त्यांच्या बांधकामादरम्यान सुमारे 2.51 कोटी मनुष्य-दिवसांसाठी थेट रोजगार निर्माण होईल.
- गुजरात, कर्नाटक, तेलंगणा, बिहार आणि आसाममधील 13 जिल्ह्यांचा समावेश असलेले हे चार प्रकल्प भारतीय रेल्वेचे विद्यमान जाळे सुमारे 565 किलोमीटरने वाढवतील.

**निर्णय: ओदिशामध्ये हायब्रीड एन्युइटी मोड (एचएएम) वर एकूण 8,307.74 कोटी रुपये खर्चाच्या 6 पदरी प्रवेश- नियंत्रित कॅपिटल रिजन रिंग मार्ग (भुवनेश्वर बायपास, 110.875 किमी) च्या बांधकामास मंजुरी**

**परिणाम:** कटक, भुवनेश्वर आणि खोर्दा या शहरांमधून होणारी अवजड वाणिज्यिक वाहतूक वळवून ओदिशा आणि इतर पूर्वेकडील राज्यांना महत्त्वपूर्ण लाभ प्रदान करेल.

- यामुळे माल वाहतुकीची कार्यक्षमता वाढेल, लॉजिस्टिक्स खर्च कमी होईल आणि प्रदेशातील सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळेल. काम पूर्ण झाल्यावर, हा बायपास प्रादेशिक आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल.
- यामुळे प्रमुख धार्मिक आणि आर्थिक केंद्रांमधील संपर्क मजबूत होईल. व्यापार आणि औद्योगिकविकासाचे नवे मार्ग खुले होतील.



**निर्णय: राजस्थानमधील कोटा-बुंदी येथे 1,507 कोटी रुपये अंदाजित खर्चाचा ग्रीनफिल्ड विमानतळ विकसित करण्यास मान्यता.**

**परिणाम:** बऱ्याच काळापासून आधुनिक विमानतळाची मागणी करणारे कोटा शहर हे शिक्षणाबरोबरच एक औद्योगिक केंद्र आहे.

- सध्याचे विमानतळ लहान आहे आणि त्याचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे आणि एक नवीन ग्रीनफील्ड विमानतळ विकसित केले जाईल.
- हा एक प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्प आहे ज्याचा उद्देश या प्रदेशातील अपेक्षित वाहतूक वाढीवर तोडगा काढणे हा आहे. तो दोन वर्षांत पूर्ण होईल.
- या प्रकल्पात 20,000 चौरस मीटर क्षेत्रफळावर टर्मिनल इमारत बांधली जाईल. गर्दीच्या वेळी ते 1,000 प्रवाशांना हाताळण्यास सक्षम असेल. त्याची वार्षिक प्रवासी वाहून नेण्याची क्षमता वीस लाख असेल.

**निर्णय: राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा 2030 साठी बोली लावायच्या प्रस्तावाला मंजुरी**

**परिणाम:** राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमुळे स्थानिक व्यवसायांना फायदा होऊन महसूल वाढेल. त्याचबरोबर रोजगाराच्या संधी निर्माण होऊन लाखो भारतीय युवा खेळाडूंना प्रेरणा मिळेल.

- जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधांसह अहमदाबाद हे यजमान शहर म्हणून प्रस्तावित करण्यात आले आहे.
- राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये 72 देशांच्या सहभागाची अपेक्षा
- पर्यटन, गुंतवणूक आणि जागतिक क्रीडा स्पर्धांच्या आयोजनात भारताची विश्वासार्हता मजबूत होईल.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयांवर पत्रकार परिषद पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

आयुष्मान भारत योजनेची 7 वर्ष

# निरोगी भारत

## विकसित भारताचा पाया



विकसित भारत 2047 च्या प्रवासात निरोगी भारत महत्वपूर्ण आहे. भारत निरोगी असावा, पुढची पिढी निरोगी राहावी यासाठी आरोग्य सेवाही विकसित होणे तितकेच गरजेचे आहे. जेव्हा भारतातील लोकांना आधुनिक रुग्णालये आणि उपचारांसाठी आधुनिक सुविधा मिळतील, तेव्हा ते लवकरात लवकर बरे होतील. त्यांच्या ऊर्जेचा योग्य वापर होऊन उत्पादकताही वाढेल. याच संकल्पनेतून गेल्या 11 वर्षात आरोग्य क्षेत्रात आधुनिक प्रणाली विकसित झाल्या आहेत जिथे गरीबातील गरीब लोकांच्या आकांक्षा पूर्ण होत आहेत कारण समावेशन आधुनिक भारताच्या आरोग्य सुधारणांचा गाभा आहे. अशा परिस्थितीत, आरोग्य क्षेत्रातील क्रांती आता निरोगी भारताकडून सुसंवादी भारतात, सुसंवादी भारताकडून सक्षम भारतात, सक्षम भारताकडून समृद्ध भारतात रूपांतरित झाली आहे, म्हणजेच अमृत काळातील भारताला विकसित राष्ट्र बनवण्याच्या सर्वात उत्साही प्रवासातील एक मौल्यवान अध्याय आहे.

'तुमचे आरोग्य, आमचा संकल्प' हे ध्येय मानून 23 सप्टेंबर 2018 रोजी सुरू झालेल्या जगातील सर्वात मोठ्या आरोग्य योजनेला - आयुष्मान भारतला 7 वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने, आरोग्य क्षेत्रातील केंद्र सरकारचे उपक्रम विकसित भारतासाठी एक मजबूत आधार कसा बनत आहेत ते जाणून घेऊया...


₹5 लाख का
मुफ़्त उपचार
नाम/NAME
ADITI YADAV
जन्म वर्ष/YOB: 2014
लिंग/GENDER: FEMALE
ABHA Number : 91-2505-0481-8775



# आयुष्मान भारत

## सार्वजनिक आरोग्याचे सुरक्षा कवच

सार्वत्रिक आरोग्य सुविधेच्या दिशेने, आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (एबी-पीएमजेएवाय) ने भारताला जगातील सर्वात मोठी आरोग्य सुरक्षा शक्ती बनवले आहे. देशातील जवळजवळ 60 कोटी लोकसंख्येला 5 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार प्रदान करणे ही केवळ एक योजना नाही तर नवीन भारताचा आत्मविश्वास आहे जो संदेश देतो की आता कोणीही उपचारांच्या खर्चाने दबणार नाही, उलट ते अधिक मजबूत होऊन पुढे जातील. जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना 23 सप्टेंबर 2018 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झारखंडमधील रांची येथून सुरू केली होती, जी आता गरीब आणि वंचित घटकांसाठी दर्जेदार उपचारांची हमी बनली आहे...

### दिल्लीमध्ये 5 लाख रुपयांचा अतिरिक्त टॉप-अप




**35** वे राज्य बनले दिल्ली, देशात आयुष्मान भारत लागू करण्याच्या बाबतीत, एप्रिल 2025 मध्ये

दिल्लीतील लाभार्थी

6.54 लाख कुटुंबे

30 लाख लोकसंख्या



ज्येष्ठ नागरिक 06 लाख

- दिल्ली सरकारने केंद्राने दिलेल्या 5 लाख रुपयांच्या आरोग्य कवच व्यतिरिक्त 5 लाख रुपयांचा अतिरिक्त टॉप-अप देण्याचा निर्णय घेतला आहे.

### जम्मू-काश्मीर चा प्रत्येक नागरिक 'आयुष्मान'

जम्मू आणि काश्मीर हे देशातील एकमेव राज्य आहे जिथे 100% लोकसंख्येला आयुष्मान भारतचा लाभ मिळत आहे. पंतप्रधान मोदींनी डिसेंबर 2020 मध्ये याची सुरुवात केली. सुरुवातीला राज्यातील फक्त 6 लाख कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळत होता, परंतु आता राज्यातील सर्व 21लाख कुटुंबांना याचा लाभ मिळत आहे.

### महिला सदस्य असलेल्या कुटुंबांना ओदिशा 5 लाख रुपयांचे अतिरिक्त विमा संरक्षण देणार




**34** वे राज्य बनले.ओदिशा हे आयुष्मान भारत लागू करणारे देशातील

- ओदिशामध्ये, ही योजना गोपबंधू जन आरोग्य योजनेसोबत राबवली जात आहे.

- या योजनेअंतर्गत, प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी 5 लाख रुपयांचे विमा संरक्षण दिले जाते आणि त्यासोबतच महिला सदस्य असलेल्या कुटुंबाला 5 लाख रुपयांचे अतिरिक्त विमा संरक्षण दिले जाते.

एकोणीस वर्षीय पार्थ सावलियाला सतत खोकला यायचा, ज्यामुळे त्याचे बालपण अडचणीचे होते आणि अभियंता होण्याचे त्याचे स्वप्नही उद्ध्वस्त झाले. अहमदाबादमधील सरकारी रुग्णालयात तपासणी केल्यानंतर असे आढळून आले की त्याच्या नाकाचे हाड (सेप्टम) वाकडे आहे, ज्याच्या उपचारासाठी (सेप्टोप्लास्टी) 15,000 रुपये खर्च येईल. हा खर्च त्याच्या कुटुंबासाठी खूप जास्त होता. त्यानंतर त्याच्या वडिलांनी आयुष्मान भारत योजनेची मदत घेतली.



आता उपचार हा एक बोजड खर्च नाही, आयुष्मान भारतने कुटुंबांना आयुष्यभराची शांती आणि आरोग्य सुरक्षा दिली आहे.

# आयुष्मान भारत-
## प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील महत्त्वाचे मुद्दे



आयुष्मान कार्ड/AYUSHMAN CARD

**41.91+** कोटीहून अधिक आयुष्मान कार्ड बनले

₹5 लाख रुपयांचा **मोफत उपचार**

पुरुष **21.21+** कोटी

महिला **20.65+** कोटी

**सर्व आकडेवारी 1 सप्टेंबर 2025 पर्यंतची**

**9.42+** कोटी रुग्णांना या योजनेंतर्गत रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पुरुष **4.29+** कोटी | महिला **4.16+** कोटी

**32,912** रुग्णालये सूचीबद्ध केली आहेत

17,666 सरकारी रुग्णालये | 15,246 खाजगी रुग्णालये

- 40% आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांना आयुष्मान भारत अंतर्गत रुग्णालयात दाखल झाल्यावर दरवर्षी 5 लाख रुपयांच्या आरोग्य विम्याचा लाभ दिला जातो. त्याचा आधार सामाजिक-आर्थिक जात जनगणना-2011आहे.
- राज्ये/केंद्रशासित प्रदेशांनी बिगर-एसईसीसी डेटा स्रोतांचा वापर करून स्वतःच्या खर्चाने योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या वाढवली आहे.
- 1.25 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या 9.42 कोटींहून अधिक रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्याची परवानगी देण्यात आली.
- या योजनेचा लाभ 27 वैद्यकीय विशेष क्षेत्रातील 1,960 हून अधिक प्रक्रियांना होत आहे.

## आयुष्मान कार्ड बनवणे आणि पात्रता तपासणे आता अधिक सोपे

जर तुम्ही आयुष्मान भारतचे लाभार्थी असाल आणि आयुष्मान कार्ड बनवू इच्छित असाल तर तुम्ही तुमच्या जवळच्या UTIITSL केंद्रात जाऊन कार्ड बनवू शकता. तसेच, जर तुम्हाला या योजनेचे लाभार्थी आहात की नाही हे तपासायचे असेल तर तुम्हाला त्याबद्दलची माहिती येथे मिळेल.

**14555**
या क्रमांकावर तुम्ही लाभार्थी आहेत कि नाही ते जाणून घेण्यासाठी फोन करा.

**1800110770**
या क्रमांकावर मिस्ड कॉल द्या. 70+ वयाच्या लोकांना आयुष्मान वय वंदना कार्ड कसे बनवायचे याबद्दल माहिती मिळेल.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत
PM-JAY

या योजनेद्वारे संपूर्ण खर्च भागवण्यात आला, ज्यामुळे कुटुंबाचे एका महिन्याचे उत्पन्न वाचले आणि काही आठवड्यांतच पार्थ पुन्हा शाळेत जाऊ लागला.

"आयुष्मान भारत योजनेचा कोट्यवधी लोकांना फायदा झाला आहे, मी त्यापैकी एक आहे. मला किडनीचा त्रास होता आणि या योजनेअंतर्गत बिहारमधील पाटणा येथे माझे उपचार झाले. देशातील गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांना या योजनेचा खूप फायदा होत आहे."

### आयुष्मान आरोग्य मंदिर

सामान्य लोकांना त्यांच्या घराजवळ मूलभूत आरोग्य सेवा देण्यासाठी, संपूर्ण आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात आयुष्मान आरोग्य मंदिरे बांधली जात आहेत. 15 जुलै 2025 पर्यंत, देशात 1,78,154 आयुष्मान आरोग्य मंदिरे सुरू करण्यात आली आहेत. येथे उप-आरोग्य केंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे मजबूत करून व्यापक प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान केली जात आहे. आरोग्य मंदिरांमध्ये संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य रोग, प्रजनन आणि बाल आरोग्य सेवांसह एकूण 12 प्रकारच्या आजारांवर उपचार केले जात आहेत.

# ...नाहीतर विम्याअभावी कुटुंबाच्या खिशातून पैसे खर्च व्हायचे




**राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेच्या (एनएसएसओ) 71 व्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की 85.9% ग्रामीण कुटुंबे आणि 82% शहरी कुटुंबांकडे आरोग्य विमा नाही. 17% पेक्षा जास्त भारतीय लोक त्यांच्या घराच्या बजेटच्या किमान 10% आरोग्य सेवांवर खर्च करतात. आरोग्य सेवांवरील जास्त खर्च कुटुंबांना कर्जबाजारी करतो. 24% पेक्षा जास्त ग्रामीण लोकसंख्या आणि 18% शहरी लोकसंख्या आरोग्य सेवा खर्च कोणत्या ना कोणत्या उधारीवर भागवतात. आता सुमारे 60 कोटी लोकसंख्येचा या अंतर्गत समावेश आहे, ज्यामुळे त्यांच्या आरोग्य खर्चाची चिंता मिटली आहे.**

"ही योजना खूप प्रभावी आणि फायदेशीर आहे." आरोग्य लाभ सहज मिळण्याचे समाधान आणि कोणत्याही खर्चाशिवाय उपचार मिळण्याची शांती हे शब्द आहेत बिहारचे ज्ञानेंद्र कुमार गुप्ता यांचे, ज्यांच्या किडनीच्या आजारावर आयुष्मान योजनेच्या मदतीने मोफत उपचार करण्यात आले आहेत. उपचारानंतर ज्ञानेंद्र यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून मनःपूर्वक आभार मानले. या क्रांतिकारी योजनेमुळे ज्ञानेंद्रसारख्या लाखो लोकांना लाभ मिळणे सोपे झाले आहे, जे सुमारे एक दशकापूर्वी वैद्यकीय खर्चाच्या ओझ्यामुळे दारिद्र्यरेषेखाली जात होते.



## आयुष्मान भारत, सर्वांसाठी आरोग्य कवच

**महिला, वृद्ध आणि मुलांसाठी संवेदनशील आणि विश्वासार्ह आरोग्य सुरक्षा, जेणेकरून सर्व वयोगटातील लोक आणि प्रत्येक कुटुंब चिंतामुक्त राहू शकेल.**

अशा स्थितीत पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची क्रांतिकारी योजना देशातील 60 कोटींहून अधिक गरीब-मध्यम वर्गातील वृद्धांसाठी वरदान ठरली आहे. देशात याआधीही सार्वत्रिक आरोग्यसेवेची चर्चा व्हायची मात्र प्रथमच एखाद्या सरकारने 5 लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांसह जगातील सर्वात मोठी आरोग्य सुविधा प्रदान केली आहे. यामुळेच लाभार्थी लोकांच्या मनातील भावना स्वाभाविकपणे दाटून येतात. ज्ञानेंद्र यांनी आपल्या मनातील भावना शब्दांमध्ये गुंफून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवल्या तेव्हा पंतप्रधान मोदी यांचीही सहजता आणि नागरिकांशी असलेल्या बंधांची भावना दाटून आली. बिहारमधील पटणा येथील रहिवासी ज्ञानेंद्र यांना लिहिलेल्या पत्रातूनही हे स्पष्ट होते. त्यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे की, "तुमच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याचे ऐकून मला खूप आनंद झाला. तुम्ही तुमच्या पत्रात आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून गेल्या काही दिवसांमध्ये मूत्रपिंडाच्या यशस्वी उपचारांबद्दल जी माहिती सामायिक केली आहे , त्यामुळे मनाला खूप समाधान लाभले आहे." ज्ञानेंद्र यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे , ""तुमचे (पंतप्रधान मोदी) धाडस आणि व्यक्तिमत्व देशातील जनतेला दिलासा आणि मार्गदर्शन देत राहील." याला उत्तर देताना पंतप्रधान मोदी देखील आपल्या भावना शब्दांमधून व्यक्त करण्यापासून स्वतःला रोखू शकले नाहीत. त्यांनी लिहिले, "वैद्यकीय खर्चामुळे कुटुंबांची आयुष्यभराची बचत एका झटक्यातसंपुष्टात येताना मी पाहिले आहे. अनेक वेळा तर लोक या खर्चामुळे उपचार करून घेण्यासही कचरत होते. आज आयुष्मान भारत योजना हे सुनिश्चित करत आहे की एकही भारतीय उपचारांपासून वंचित राहणार नाही. योग्य उपचार मिळाल्यावर कशा प्रकारे एका व्यक्तीच्या आयुष्याला नवी उमेद आणि दिशा मिळते हे या योजनेने सिद्ध करून दाखवले आहे. "

एक निरोगी व्यक्ती केवळ आपल्या कुटुंबाला आधार देत नाही तर राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत देखील सक्रिय भूमिका बजावते. या वास्तवाला धोरणे आणि योजनांशी जोडून, गेल्या 11 वर्षांमध्ये केंद्र सरकारने आरोग्य क्षेत्रात एका नवीन क्रांतीची सुरुवात केली आहे. आज देशात प्रत्येक गरीबापर्यंत उत्तम आरोग्य सुविधा पोहचवण्याचे अभियान जलद गतीने सुरु आहे. यासाठी आरोग्य शिक्षणात आवश्यक मोठ-मोठ्या सुधारणा करण्यात आल्या आहेत , त्याचबरोबर देशात वैद्यकीय शिक्षणासाठी जागा देखील वाढवण्यात आल्या आहेत. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत देशातील गावागावांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहचवल्या जात आहेत. जन औषधी योजनेच्या माध्यमातून गरीब आणि मध्यमवर्गीयांना स्वस्त दरात औषधे उपलब्ध करून दिली जात आहेत. गरोदर महिला आणि लहान मुलांचे लसीकरण यांचा मागोवा घेण्यासाठी एक डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. कोट्यवधी लोकांकडे एक अनोखे डिजिटल आरोग्य ओळखपत्र आहे. टेलिमेडिसिनमुळे आता कुणीही डॉक्टरपासून खूप दूर नाही. केंद्र सरकारच्या उपक्रमांमुळे एक उत्साहवर्धक प्रगती झाली आहे. एकूण

> "देशाच्या आरोग्य क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आम्ही एका राष्ट्रीय दृष्टिकोनासह , एका नवीन राष्ट्रीय आरोग्य धोरणावर काम केले. स्वच्छ भारत अभियानापासून ते आयुष्मान भारत आणि आयुष्मान भारत डिजिटल मिशनपर्यंत, असे अनेक प्रयत्न याचाच एक भाग आहेत.
>
> -नरेंद्र मोदी, पंतप्रधान





# आरोग्य सुविधांचे स्वरुप बदलले तर मिळू शकतात सकारात्मक परिणाम

## वैद्यकीय शिक्षणाची वाढली व्याप्ती




* यापैकी 19 मध्ये पदवी शिक्षण सुरु

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगानुसार

**13,86,157**

नोंदणीकृत ॲलोपॅथिक डॉक्टर आहेत.

**811** लोकांसाठी 1 डॉक्टर आहे

**157**

वैद्यकीय महाविद्यालयांचे बांधकाम जिल्हा/रेफरल रुग्णालयांचे आधुनिकीकरण करून मंजूर करण्यात आले. यापैकी 131 मध्ये काम सुरू झाले आहे.

**75**

प्रकल्पांना पंतप्रधान आरोग्य सुरक्षा योजनेअंतर्गत सुपर स्पेशालिटी ब्लॉकसाठी मंजुरी देण्यात आली. यापैकी 71 प्रकल्प पूर्ण झाले.

## आरोग्यावरील सरकारी खर्चात वाढ वाचले सामान्य माणसाचे पैसे

गेल्या दशकात, आरोग्याशी संबंधित उपक्रमांना वित्तपुरवठा करण्याच्या बाबतीत लक्षणीय बदल दिसून आला आहे. केंद्र सरकारने आपल्या कल्याणकारी योजनांद्वारे उपचारांवरील सामान्य माणसाच्या खर्चाचा भार कमी केला आहे. 2013-14 पासून ते 2021-22 पर्यंत परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. 2013-14 मध्ये आरोग्यावरील एकूण खर्चात सरकारचा वाटा 28.6% होता आणि सामान्य लोकांचा वाटा 64.2% होता. 2021-22 मध्ये उपचारावरील सामान्य लोकांचा खर्च कमी होऊन 39.4% इतका राहिला. तर सरकारचा खर्च वाढून सुमारे 48 टक्के झाला.

- आर्थिक सर्वेक्षण 2024-25 मध्ये आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेद्वारे खिशातून होणारा खर्च कमी करण्यास मदत झाली आहे. यामुळे 1.25 लाख कोटी रुपयांहून अधिक बचत झाली आहे.



आरोग्य खर्चाच्या टक्केवारीच्या तुलनेत वैयक्तिकरित्या केल्या जाणाऱ्या खर्चात देखील लक्षणीय घट झाली आहे. त्याचबरोबर, सरकारी आरोग्य खर्चातही उल्लेखनीय वाढ झाली आहे. आतापर्यंत जवळपास दोन लाख आरोग्य-कल्याण केंद्रे बांधण्यात आली आहेत. आता तालुका स्तरावर चांगली रुग्णालये आणि आधुनिक प्रयोगशाळांचे जाळे निर्माण करण्यावर विशेष काम केले जात आहे. आरोग्य क्षेत्रात स्वातंत्र्यानंतरच्या 6-7 दशकांमध्ये जी कामे झाली नाहीत ती मागील 11 वर्षांमध्ये झाली आहेत. देशात विक्रमी संख्येने नवीन एम्स आणि वैद्यकीय महाविद्यालये उघडण्यात आली आहेत. रुग्णालयांची वाढती संख्या हे दर्शवते की वैद्यकीय जागांची संख्या देखील तितक्याच वेगाने वाढत आहे जेणेकरून कुठल्याही गरीब मुलाचे डॉक्टर बनण्याचे जे स्वप्न आहे ते सहजरीत्या पूर्ण होईल. मध्यम वर्गातील कुठल्याही मुलाला नाईलाजाने वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात जावे लागणार नाही. वैद्यकीय जागा वाढवण्याचे एक अभियान सुरु आहे. मागील 11 वर्षांमध्ये एमबीबीएस आणि एमडी च्या एकूण एक लाखांहून अधिक नवीन जागांची भर पडली आहे.

# माता आणि बालमृत्यू दरात घट




संयुक्त राष्ट्रांच्या मातृ मृत्युदर अंदाज आंतरसंस्था गटाच्या (UN-MMEIG) अहवालानुसार, 1990 ते 2023 दरम्यान भारतात माता मृत्युदरात 86% घट झाली आहे.

माता मृत्यु दर (प्रति लाख जन्म)




■ जीडीपीमध्ये आरोग्य क्षेत्रावरील खर्चाचा वाटा सातत्याने वाढतच आहे.




■ सामान्य सरकारी खर्चात वाढला आरोग्यावरील खर्चातला सरकारी खर्चाचा वाटा




(*टीप- सर्व आकडे टक्क्यांमध्ये )




बालमृत्यू दर
(प्रति 1,000 जिवंत जन्मांमागे)

नवजात बालक मृत्युदर
(प्रति 1,000 जिवंत जन्मांमागे)




5 वर्षांपेक्षा कमी वयोगटातील बालकांचा मृत्युदर
(प्रति 1,000 जिवंत जन्मांमागे)




(*नमुना नोंदणी प्रणाली सांख्यिकी अहवाल 2021 नुसार आकडेवारी )

खरंतर अशा एका देशात जिथे आरोग्यसेवेची उपलब्धता एकेकाळी विशेषाधिकारांवर अवलंबून होती, त्या देशात पंतप्रधान मोदी यांनी सार्वजनिक आरोग्य सेवेचा पाया पुन्हा परिभाषित केला जेणेकरून कुणीही भारतीय वंचित राहू नये. 2014 पूर्वी भारतात आरोग्य हे एक दुर्लक्षित क्षेत्र होते , इतके की स्वातंत्र्याच्या 70 वर्षांनंतरही सार्वत्रिक आरोग्यसेवेची चर्चा केवळ कागदोपत्रीच मर्यादित राहिली. परंतु विद्यमान केंद्र सरकारने आयुष्मान भारत योजनेद्वारे ते प्रत्यक्षात साकारले आहे. आरोग्य खर्चात 85% वाढ करण्यात आली आहे, ज्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात संसाधने पोहोचतील हे सुनिश्चित झाले आहे. 2014 मध्ये पंतप्रधान मोदी सत्तेत येण्यापूर्वी भारतात आरोग्य सेवा गरीबांसाठी मोठा भार होता. कुटुंबांना अनेकदा वैद्यकीय उपचार आणि इतर मूलभूत गरजांमधून निवड करावी लागत होती. ही स्थिती झपाट्याने बदलत आहे. आरोग्यावर खिशातून होणाऱ्या खर्चात वेगाने घट झाली आहे.



## ऐतिहासिक उपक्रमांची 11 वर्षे

# भारतात आरोग्य क्रांतीची पायाभरणी

### राष्ट्रीय आरोग्य धोरण 2017

भारतात सर्वांसाठी समान, स्वस्त आणि दर्जेदार आरोग्यसेवा सुनिश्चित करून सार्वभौमिक आरोग्य व्याप्ती साध्य करण्याच्या उद्दिष्टासह 15 मार्च 2017 रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय आरोग्य धोरणाला मंजुरी दिली.

अमृत फार्मसी

### इंप्लांट आणि गंभीर आजारांवरील औषधे अर्ध्या किमतीत

केंद्र सरकारने गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना दिलासा देण्यासाठी अनेक सरकारी रुग्णालयांमध्ये अमृत फार्मसी सुरू केली आहे. इथे औषधे, इम्प्लांट्स, सर्जिकल डिस्पोजेबल आणि सर्जिकल उपकरणे बाजारभावापेक्षा 50 टक्के पर्यंत सवलतीत उपलब्ध आहेत. कर्करोग आणि हृदयरोगावरची महागडी औषधे स्वस्त दरात उपलब्ध आहेत.

**6** कोटींहून अधिक नागरिकांनी आतापर्यंत लाभ घेतला आहे.







प्रधानमंत्री जनऔषधि केंद्र

### म्हणजेच उत्तम औषधे स्वस्त औषधे

उपचारांवरील महागड्या खर्चात समाविष्ट औषधे सामान्य लोकांना 50 ते 90% पर्यंत स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री भारतीय जन औषधी परियोजनेची सुरुवात करण्यात आली. या अंतर्गत यावर्षी 30 जून पर्यंत सुमारे 17 हजार औषधी केंद्रे उघडण्यात आली आहेत. मार्च, 2027 पर्यंत त्यांची संख्या 25 हजार पर्यंत पोहचवण्याचे उद्दिष्ट आहे.

लाभ

**2,110** प्रकारची औषधे आणि 315 शस्त्रक्रिया उपकरणे परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध आहेत.



**38,000** कोटी रुपयांची अंदाजे बचत झाली आहे सामान्य माणसांची मागील 11 वर्षांमध्ये

### गुडघा प्रत्यारोपण करून घेणे झाले सोपे

ऑगस्ट 2017 मध्ये, कृत्रिम गुडघ्याची किंमत निश्चित करण्यात आली. या अंतर्गत, सर्वात जास्त वापरल्या जाणाऱ्या कोबाल्ट क्रोमियम युक्त गुडघ्याची किंमत 65% ने कमी करून कमाल किंमत 54,720 रुपये निश्चित करण्यात आली. टायटॅनियम आणि ऑक्सिडाइज्ड झिरकोनियम सारख्या विशेष धातूंपासून बनवलेल्या गुडघ्याच्या किमती 69% ने कमी करून कमाल किंमत 76,600 रुपये करण्यात आली आहे.





### हृदयरोग्यांना मिळाला दिलासा

केंद्र सरकारने फेब्रुवारी 2017 मध्ये, बेअर मेटल स्टेंटची किंमत 7,260 रुपये आणि ड्रग-एल्युटिंग आणि बायोडिग्रेडेबल स्टेंटची किंमत 29,600 रुपये निश्चित करून हृदयरोग्यांना मोठा दिलासा दिला. या किंमती तत्कालीन बाजारभावापेक्षा सुमारे 85% कमी होत्या.

कोणत्याही देशात मजबूत आरोग्य विषयक पायाभूत सुविधा केवळ नागरिकांच्या कल्याणासाठीच आवश्यक नाहीत तर आर्थिक प्रगती बरोबरच सामाजिक स्थैर्यातही योगदान देतात. याच विचाराने मागील 11 वर्षांमध्ये असे अनेक उपक्रम राबवण्यात आले ज्यांनी भारतात आरोग्य क्षेत्रात नव्या क्रांतीची केली पायाभरणी

माता आरोग्य योजना

## जीवन रक्षा आणि मजबूत भविष्याचा पाया

भारतात माता मृत्युदर ही बऱ्याच काळापासून सार्वजनिक आरोग्याची समस्या राहिली आहे. या दिशेने अनेक महत्त्वपूर्ण प्रयत्न केले गेले आहेत. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत, मोफत संस्थात्मक प्रसूती आणि नवजात शिशु देखभालीला प्रोत्साहन देण्यासाठी 2014-15 पासून 16.60 कोटींहून अधिक लाभार्थ्यांना सेवा पुरवण्यात आली आहे. तर जननी सुरक्षा योजनेत सशर्त रोख हस्तांतरणाद्वारे संस्थात्मक प्रसूतीला प्रोत्साहन देण्यात आले आहे, ज्याचा मार्च 2025 पर्यंत 11.07 कोटींहून अधिक महिलांना लाभ मिळाला आहे. तसेच , सुरक्षित मातृत्व आश्वासन (सुमन ) ने गर्भवती महिलांसाठी सन्मानजनक आणि गुणवत्तापूर्ण देखभाल बळकट केली आहे, ज्या अंतर्गत मार्च 2025 पर्यंत संपूर्ण भारतात 90,015 सुमन आरोग्य सुविधा अधिसूचित करण्यात आल्या आहेत.



प्रधानमंत्री मातृ वंदना योजना: पहले प्रसव पर 5,000, दूसरे में बेटी होने पर 6,000 रुपये लाभ।

## पीएम आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान

कोविडमधून धडा मिळाल्यानंतर , पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खालपासून वरपर्यंत पायाभूत आरोग्यसेवा सुविधा बदलण्यासाठी 25 ऑक्टोबर 2021 रोजी देशातील सर्वात मोठा उपक्रम सुरू केला. याला नाव देण्यात आले पंतप्रधान-आयुष्यमान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान. या परिवर्तनकारी उपक्रमाचा उद्देश 64,180 कोटी रुपये एकूण खर्चासह वर्ष 2025-26 पर्यंत प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय स्तरावर एक मजबूत आरोग्य प्रणाली निर्माण करणे आहे, जेणेकरून वर्तमानासह भविष्यातही महामारी , सार्वजनिक आरोग्य , संकटकाळ आणि आपत्तींचा प्रभावीपणे सामना करता येईल.

## जिल्हा रुग्णालयांमध्ये डे केअर कॅन्सर सेंटर

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या (आयसीएमआर ) च्या एका अभ्यासानुसार, 2020 च्या तुलनेत 2025 च्या अखेरीस भारतात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या 13% ने वाढेल. म्हणूनच केंद्र सरकारने 2025-26 मध्ये देशात 200 कर्करोग केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय आगामी 3 वर्षांमध्ये सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये डे केअर कॅन्सर सेंटर (डीसीसीसी ) स्थापन करण्याची योजना आखली जात आहे. रुग्णांना स्वस्त दरात औषधे उपलब्ध व्हावी यासाठी 36 जीवन रक्षक औषधांना मूळ सीमाशुल्कातून पूर्णपणे सूट देण्यात आली आहे.

### आता प्रत्येक घरात स्वस्त, सुलभ आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा

भारताच्या आरोग्य सेवा व्यवस्थेत गेल्या 11 वर्षांमध्ये उल्लेखनीय बदल झाले आहेत. वर्ष 2018 मध्ये, आयुष्मान भारत योजना सुरू करण्यात आली, ज्याचा उद्देश गरीब कुटुंबांना उपचारांवरील मोठ्या खर्चापासून वाचवणे हा होता. आज ही योजना सुमारे 41 कोटी लोकांना लाभ पोहचवत आहे. यात विमा, आजाराला प्रतिबंध आणि डिजिटल तंत्रज्ञानावर भर देण्यात आला आहे , ज्यामुळे गरजू लोकांना स्वस्त आणि सहजरित्या उपलब्ध उपचाराची सुविधा मिळाली आहे.

सुरुवातीपासूनच आयुष्मान भारत योजनेचा उद्देश दोन मोठ्या समस्या सोडवणे हा होता - गावांमध्ये चांगल्या आरोग्य सेवांची कमतरता आणि गरीब कुटुंबांवर उपचारांच्या खर्चाचा मोठा भार . 2018 पूर्वी, गावांमध्ये राहणाऱ्या लोकांना अनेकदा या समस्यांना तोंड द्यावे लागत असे. या समस्या सोडवण्यासाठी सरकारने पंतप्रधान जन आरोग्य योजना (पीएम-जय ) सुरु केली , ज्यामध्ये प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी 5 लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळू शकतात . अवघ्या सात वर्षांमध्ये आयुष्मान कार्ड मिळवणाऱ्यांची संख्या 41 कोटींहून अधिक झाली आहे. हे केवळ आयुष्मान कार्ड नाही तर गरीबांसाठी जीवन कवच आहे.

### नागरिकांना त्यांच्या खिशातून करावा लागणारा उपचारांवरील खर्च झाला कमी

आरोग्य क्षेत्रातील यशाचे सर्वात मोठे कारण हे आहे की लोकांना आता आपल्या खिशातून उपचारांवर पूर्वीइतका खर्च करावा लागत नाही. 2014 मध्ये, जेव्हा आयुष्मान भारत योजना सुरू झाली नव्हती, तेव्हा लोक त्यांच्या उपचारांवरील सुमारे 62% खर्च स्वतः करत होते. आता हे प्रमाण कमी होऊन केवळ 38% वर आले आहे.प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या मदतीने देशातील लोकांची 1.25 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक बचत झाली आहे. यासोबतच, जन औषधी केंद्रांमधून स्वस्त औषधे खरेदी करून लोकांनी 38,000 कोटी रुपयांपेक्षा अधिक

बचत केली आहे. 'आयुष्मान आरोग्य मंदिर' उपक्रमांतर्गत, सुमारे 2 लाख निरामयता केंद्रे उघडण्यात आली आहेत. ही केंद्रे गावे आणि परिसरातील लोकांची, विशेषतः उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यादी आजारांनी ग्रस्त असलेल्यांची तपासणी करतात. या योजनेमुळे आतापर्यंत 200 कोटींहून अधिक तपासण्या करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे आजाराचे निदान लवकर होते आणि मोठ्या खर्चाच्या उपचारांची गरज कमी पडते. त्याचबरोबर, ऑक्टोबर 2021 मध्ये सुरु झालेल्या 'पंतप्रधान आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान' अंतर्गत, 64,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून देशातील रुग्णालये सुधारण्यात आली आहेत. असे परिसर जे पूर्वी मागास होते तिथे आता गंभीर रुग्णांसाठी विशेष व्यवस्था, देखरेख केंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

### जेणेकरून प्रत्येक वृद्ध व्यक्तीला मिळेल आरोग्याच्या चिंतांपासून मुक्ती

भारतात वृद्ध व्यक्तींची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे.एका अहवालानुसार 2026 पर्यंत 17 कोटी, 2036 पर्यंत सुमारे 23 कोटी तर वर्ष 2050 पर्यंत 35 कोटी म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या 20 टक्क्यांहून अधिक वृद्धांची संख्या होईल. गेल्या काही वर्षांमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या गुणोत्तरात सतत वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे केंद्र सरकारच्या वतीने दिल्या जाणाऱ्या आरोग्य, निवृत्तीवेतन, स्वयंरोजगार आणि स्वावलंबनाशी संबंधित योजना आहेत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी न केवळ दीर्घायुष्य जीवन जगावे तर सुरक्षित, सन्मानपूर्ण, सर्जनशील आणि प्रतिष्ठित जीवन देखील जगले पाहिजे. यासाठी आयुष्मान भारत योजनेत एक क्रांतिकारी बदल 2024 च्या अखेरीस झाला. आता 70 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या प्रत्येक भारतीय नागरिकाला या योजनेत सहभागी करून घेण्यात आले, भले त्याचे उत्पन्न किंवा पार्श्वभूमी काही का असेना. यामुळे सुमारे 6 कोटी वृद्धांना उपचाराची सुविधा मिळू लागली. वयाच्या या टप्प्यावर जेव्हा आरोग्यविषयक चिंता अधिक सतावतात, त्यापासून मुक्ती मिळवून देण्याचा हा संवेदनशील प्रयत्न बनला आहे. आता वृद्धांना मोठ्या रुग्णालयांमध्येही मोफत उपचार मिळू शकतील. जानेवारी 2025 पर्यंत 40 लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेत आपले नाव नोंदवले होते, ज्यामुळे त्यांना भविष्यात आपल्या आरोग्याची चिंता करावी लागणार नाही.

### महिलांसाठी वरदान ठरली योजना

महिला आणि आघाडीचे आरोग्य कर्मचारी आयुष्मान भारत योजनेची मोठी ताकद आणि लाभार्थी आहेत.या योजनेअंतर्गत सुमारे 49 टक्के आयुष्मान कार्ड महिलांची आहेत तसेच रुग्णालयात भर्ती होणाऱ्यांमध्ये 48 टक्के महिला आहेत. फेब्रुवारी..



## यशाची 'आभा' मय कहाणी

**80.47** कोटींहून अधिक आयुष्मान भारत आरोग्य खाते (आभा) तयार झाली.

**71.44** कोटी इलेक्ट्रॉनिक आरोग्य नोंदी विविध आरोग्य पोर्टलशी जोडण्यात आल्या आहेत.

**4.21** लाखांहून अधिक सत्यापित आरोग्य सुविधा केंद्र नोंदणीकृत

**6.93** लाखांहून अधिक सत्यापित आरोग्य व्यावसायिक नोंदणीकृत

*टीप: 1 सप्टेंबर-2025 पर्यंतचे आकडे

## टेलिमेडिसिन सेवा ई-संजीवनी आता घरबसल्या उपचार

वर्ष 2020 मध्ये कोविड काळात जेव्हा छोट्यामोठ्या आजारांसाठी देखील डॉक्टरांचा सल्ला घेणे कठीण झाले होते तेव्हा निःशुल्क आणि दुरस्थ वैद्यकीय सल्ल्याच्या उद्देशाने ई-संजीवनी च्या रूपाने टेली - कन्सल्टेशनची सुरुवात करण्यात आली.

**36** कोटींहून अधिक लोकांनी आता पर्यंत लाभ घेतला आहे.

**130** विशेष तज्ञ डॉक्टर ई-संजीवनी वर उपलब्ध आहेत.

**2,32,291** आरोग्य सेवा प्रदात्यांना आतापर्यंत याच्याशी जोडण्यात आले आहे.

## डिजिटल आरोग्य अभियान

# आरोग्य सेवांमधील सुविधांचा एक नवीन अध्याय



भारतासारख्या 140 कोटी लोकसंख्या असलेल्या आणि भौगोलिक आव्हाने असलेल्या देशात, आरोग्य सेवांचे लाभ शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवणे हे कुठल्याही आव्हानापेक्षा कमी नाही. म्हणूनच आरोग्य सेवांमध्ये तंत्रज्ञानाची जोड देऊन ही सुविधा सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने, 2020 मध्ये राष्ट्रीय डिजिटल आरोग्य अभियान सुरू करण्यात आले. पथदर्शी प्रकल्पाच्या यशानंतर ते आयुष्मान भारत डिजिटल मिशन रूपात संपूर्ण देशभरात लागू करण्यात आले. या अंतर्गत प्रत्येक भारतीयाला आरोग्य ओळखपत्र दिले जात आहे. या आरोग्य खात्यात प्रत्येक तपासणी , प्रत्येक आजार , डॉक्टरांशी भेट , घेतलेली औषधे आणि निदान यांचे विवरण असते. भलेही रुग्ण नवीन ठिकाणी स्थलांतरित झाला किंवा एखाद्या नवीन डॉक्टरांना भेटला, ही पोर्टेबल सेवा आहे. त्याला केवळ आभा (विशिष्ट क्रमांक ) सांगावा लागेल, त्याच्या आरोग्याशी संबंधित सर्व माहिती उपलब्ध होईल.

त्याचबरोबर नोंदणीकृत आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या एका व्यापक डेटाबेससाठी आरोग्यसेवा व्यावसायिक रजिस्ट्री , संपूर्ण भारतात आरोग्य सुविधांसाठी एका डिजिटल भांडारासाठी आरोग्य सुविधा रजिस्ट्री आणि आरोग्य सेवांची सुविधा डिजिटल पद्धतीने प्रदान करण्यासाठी एका ओपन नेटवर्क अंतर्गत रुग्णालय, डॉक्टर, प्रयोगशाळांच्या एकीकृत आरोग्य इंटरफेस प्लॅटफॉर्मची देखील सुरुवात करण्यात आली आहे.



### तुमच्यासाठी आवश्यक ...

## असे बनवू शकता आपले आभा कार्ड

अधिकृत संकेतस्थळ https://abha.abdm.gov.in/abha/v3/ च्या माध्यमातून तुम्ही तुमचे आभा कार्ड बनवू शकता.

- संकेतस्थळावर गेल्यानंतर, तुम्हाला 'क्रिएट आभा नंबर ' वर क्लिक करावे लागेल. यानंतर, तुम्हाला आधार किंवा ड्रायव्हिंग लायसन्स या पर्यायावर क्लिक करावे लागेल.
- तुम्ही जो कोणता पर्याय निवडाल, त्यानंतर तुम्हाला तुमची माहिती भरावी लागेल. उदाहरणार्थ, तुमचा आधार क्रमांक टाका, त्यानंतर तुमच्या मोबाईलवर एक ओटीपी येईल. तो एंटर करा.
- त्याचबरोबर आपला ई-मेल ॲड्रेस देखील भरा.
- यानंतर, पेजवरील Next या पर्यायावर क्लिक करा आणि पुढे जा. तुमचे आभा कार्ड तयार होईल.

### यु-विन

लसीकरण वितरणात कार्यक्षमता आणि दायित्व आणखी वाढवण्यासाठी, सरकारने युनिव्हर्सल इम्युनायझेशन प्रोग्राम (युआयपी ) अंतर्गत एक डिजिटल उपक्रम, यु-विन प्लॅटफॉर्म सुरू केला.हा एक डिजिटल प्लॅटफॉर्म आहे जो गरोदर महिला आणि मुले (0-16 वर्ष ) साठी लसीकरण सुव्यस्थित करतो आणि त्याचा मागोवा घेतो.



**10.48** कोटी लाभार्थींची मे 2025 पर्यंत यू -विन वर नोंदणी करण्यात आली आहे.

**93.91** लाख प्रसूती

**1.88** कोटी लसीकरण सत्रे

**41.73** कोटी लसीच्या मात्रांची नोंद झाली.

2024 मध्ये सरकारने 37 लाख आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांनाही त्यांची महत्त्वाची भूमिका ओळखून या योजनेत समाविष्ट केले. या सेविकांना सुरक्षा प्रदान करून ही योजना भारतातील प्राथमिक आरोग्य सेवांना बळकटी देत आहे. भारताच्या आरोग्यसेवा क्षेत्रातील आणखी एक मोठे यश म्हणजे आयुष्मान भारत योजनेत दिल्लीचा समावेश. पूर्वी, राजकीय कारणांमुळे दिल्लीतील लोक या योजनेच्या लाभांपासून वंचित होते आणि त्यांना महागड्या खाजगी उपचारांवर अवलंबून राहावे लागत असे; परंतु पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ही योजना दिल्लीपर्यंत पसरविली, त्यामुळे आता आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांना मोफत आणि चांगल्या दर्जाचे उपचार मिळण्याची खात्री झाली आहे.

### सामाजिक हिताच्या योजनांनी बदलला चेहरामोहरा

निरोगी मनातच निरोगी विचार असतात. विकसित भारताच्या प्रवासात अस्वस्थ समाज किंवा अशिक्षित समाजाची कल्पनाही करता येत नाही. 21व्या शतकातील भारतात स्वप्ने पूर्ण करण्याचे साधन व्यक्तीपासून सुरू होते, कुटुंबापासून सुरू होते, परंतु जर लोकसंख्या शिक्षित नसेल, निरोगी नसेल तर ते घर आनंदी नसते आणि तो देश आनंदी नसतो. म्हणूनच आरोग्याशी संबंधित विविध पैलूंवरील सामाजिक हिताच्या योजना प्रत्यक्षात आणून केंद्र सरकारने क्रांतिकारी बदल घडवून आणले आहेत. आज प्रत्येकाकडे स्वतःचे पक्के घर असावे, यासाठी घर योजना, प्रत्येक घरात वीज, उज्ज्वला योजनेद्वारे प्रत्येक स्वयंपाकघरात मोफत स्वयंपाक गॅसची व्यवस्था करण्यात आली आहे, स्वच्छता अभियानांतर्गत 12 कोटी शौचालये बांधण्यात आली आहेत, जल जीवन मिशन



# कोविडचे आव्हान
# असा केला देशाने सामना

2020 मध्ये कोविड-19 साथीच्या आजाराने केवळ एक आव्हानच निर्माण केले नाही तर भविष्यातील अडचणींसाठी तयारी करण्याचे कौशल्य देखील शिकवले. जेव्हा संपूर्ण जगासह भारतातही ही साथ पसरत होती, तेव्हा देशाने आपल्या आरोग्य पायाभूत सुविधांमध्ये आमूलाग्र बदल सुरू केले. भारताने केवळ या आव्हानाचा सामना केला नाही तर, स्वदेशी लसींसह जगातील सर्वात मोठी लसीकरण मोहीम राबवून जागतिक नेता म्हणून उदयासही आला.

## सर्वात मोठी कामगिरी

**220.67**
कोटींहून अधिक लसींच्या मात्रा भारतात यशस्वीरित्या देण्यात आल्या.

- 2.50 कोटींहून अधिक मात्रा दिल्या गेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 17 सप्टेंबर 2021 रोजी, एकाच दिवसात. एका दिवसातील सर्वाधिक मात्रांचा विक्रम.
- जगातील इतर देशांना लस मैत्री कार्यक्रमांतर्गत जागतिक बंधुता आणि एक पृथ्वी - एक आरोग्य या मंत्रानुसार भारताने 30 कोटी मात्रा प्रदान केल्या.

## पायाभूत सुविधा ऐतिहासिक सुधारणा

| | मार्च 2020 | आता / नोव्हेंबर 2023 |
|---|---|---|
| चाचणी प्रयोगशाळा | 14 | 3,400 (आता) |
| आयसीयू बेड | 2,168 | 1.45 लाख (नोव्हेंबर 2023) |
| ऑक्सिजन बेड | 50,583 | 5.5 लाख (नोव्हेंबर 2023) |

पीपीई किट उत्पादन मार्च 2020 **0** आता क्षमता **दररोज 4.5 लाख**

- 1,500 हून अधिक पीएसए ऑक्सिजन प्लांट उभारले. हे प्लांट पीएम केअर्स तसेच विविध मंत्रालये आणि सार्वजनिक उपक्रमांच्या मदतीने उभारण्यात आले.
- 36,840 टनांहून अधिक द्रव वैद्यकीय ऑक्सिजन 900 ऑक्सिजन रेल्वेगाड्यांमधून गंभीरपणे बाधित राज्यांमध्ये पोहोचवण्यात आला.
- 4,176 रेल्वे डबे पूर्णपणे कार्यरत असलेल्या अलगीकरण आणि विलगीकरण सुविधांमध्ये रूपांतरित करण्यात आले.

हवाई दलाने क्रायोजेनिक ऑक्सिजन टँकर आणि आवश्यक वैद्यकीय उपकरणे विमानाने पोहोचवली.





सुमारे 16 कोटी ग्रामीण कुटुंबांसाठी स्वच्छ पाण्याची सुविधा सुनिश्चित करत आहे. आज सुमारे 60 कोटी भारतीयांना व्यापून आयुष्मान भारत योजना गरीब आणि नव-मध्यमवर्गीयांसाठी उच्च दर्जाची आणि परवडणारी आरोग्य सेवा सुनिश्चित करत आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य जर्नलपैकी एक, 'लॅन्सेट'ने आयुष्मान भारतचे कौतुक केले आहे आणि म्हटले आहे की ही योजना भारतातील आरोग्य क्षेत्राशी संबंधित असंतोष दूर करत आहे. या सर्व सामाजिक चिंता योजनांनी आरोग्य आव्हानाला पराभूत करण्यात परिवर्तनकारी भूमिका बजावली आहे. 'लॅन्सेट'ने त्यांच्या एका अभ्यासात असे म्हटले आहे की, आयुष्मान भारतमुळे कर्करोगाचा उपचार वेळेवर सुरू करण्याच्या दरात लक्षणीय सुधारणा झाली आहे. रुग्णांना 30 दिवसात कर्करोगाचे उपचार मिळण्यात 90 टक्के वाढ दिसून आली. आता नवीन भारताने संकल्प केला आहे की आपण एकत्रितपणे असा भारत निर्माण करू जो स्वच्छ, निरोगी असेल आणि स्वराज्याचे स्वप्न पूर्ण करेल.

### जनौषधी - स्वस्तही, चांगलीही

बऱ्याचदा उपचारांसाठी रुग्णालयात दाखल होण्याची आवश्यकता नसते. डॉक्टरांनी सांगितलेले औषध घरीच घ्यावे लागते; अशा परिस्थितीत, आज मेडिकल स्टोअरमधून स्वस्त औषधे मिळण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे. भारतीय जनौषधी योजनेतून (पीएमबीजेपी) केवळ औषधेच उपलब्ध नाहीत तर, यामुळे देशातील कोट्यवधी लोकांच्या

> "समावेशकता हा भारतातील आरोग्य सुधारणांचा गाभा आहे. आपण आयुष्मान भारत ही जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना चालवतो. जगातील आरोग्य हे आपण सर्वात असुरक्षित लोकांची किती चांगली काळजी घेतो, यावर अवलंबून असते. विकसनशील देश विशेषकरून आरोग्य आव्हानांमुळे प्रभावित आहेत. भारताचा दृष्टिकोन एक अनुकरणीय, मापनीय आणि शाश्वत प्रारूप प्रदान करतो.
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# योग, आयुर्वेद आणि पारंपरिक चिकित्सा प्रणालीला भारताने पुन्हा मिळवून दिली जागतिक मान्यता

योग, आयुर्वेद आणि पारंपरिक चिकित्सा प्रणालीला आज पुन्हा एकदा जागतिक मान्यता मिळाली आहे आणि यामागे आहेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे महान विचार ज्यांच्या मदतीने 2014 मध्ये पहिल्यांदाच आयुष मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. आता केवळ देशातच नाही तर, जगभरात आयुर्वेद आणि योगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला असून त्यांची स्वीकृती देखील वाढली आहे...

**7,51,768**

डॉक्टर सध्या आयुष चिकित्सा प्रणालीमध्ये नोंदणीकृत आहेत

भारताने पुराव्यावर आधारित पारंपरिक चिकित्सेमध्ये जागतिक स्तरावरील एक आघाडीचा देश म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे आणि आयुष संशोधन पोर्टल आता 43,000 हून अधिक अभ्यासांचे आयोजन करत आहे.



- 21 जून 2015 रोजी पहिल्यांदा योग दिन साजरा करण्यात आला. 11 डिसेंबर 2014 रोजी भारताचा प्रस्ताव मान्य करून संयुक्त राष्ट्रांनी 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला.
- गेल्या 10 वर्षांत प्रकाशित झालेल्या प्रबंधांची संख्या गेल्या 60 वर्षांमधील प्रकाशनांपेक्षा जास्त आहे.
- आयुष क्षेत्राने जलद आर्थिक वाढ दर्शविली आहे. 2014 मध्ये 2.85 अब्ज डॉलर्स एवढा असणारा त्याच्या उत्पादन बाजारपेठेचा आकार 2023 मध्ये 23 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढला आहे. आयुष उद्योग 200 अब्ज डॉलर्सच्या उद्दिष्टाकडे वेगाने वाटचाल करत आहे.
- आयुष ग्रिड अंतर्गत पायाभूत सुविधा मजबूत केल्या जात आहेत आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या एकात्मिकतेवर नव्या जोमाने पुन्हा लक्ष केंद्रित केले जात आहे.
- 'वाय ब्रेक योगा'सारख्या अधिक समग्र आशयाचे आयोजन करण्यासाठी 'आय गॉट प्लॅटफॉर्म'
- योगाला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा लाभ घेतला जात आहे.
- गुजरातच्या जामनगर येथे जागतिक आरोग्य संघटनेच्या पारंपरिक चिकित्सा केंद्राची स्थापना ही एक ऐतिहासिक कामगिरी आहे, जी पारंपरिक चिकित्सा क्षेत्रातील भारताचे नेतृत्व मजबूत करते.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 5 जानेवारी 2025 रोजी दिल्लीतील रोहिणी येथे केंद्रीय आयुर्वेद संशोधन संस्थेच्या इमारतीची पायाभरणी केली.
- गेल्या एका दशकात आयुष प्रणालीचा विस्तार 100 हून अधिक देशांमध्ये झाला आहे.
- पारंपरिक चिकित्सा प्रणालीचा विस्तार करण्यासाठी देशात 10 नवीन आयुष संस्था उघडल्या जात आहेत.
- भारत सरकारने 29 मे 2025 रोजी 'आयुष निवेश सारथी' पोर्टल सुरू केले. हा एक समर्पित, गुंतवणूकदार-केंद्रित डिजिटल मंच आहे.

खर्चाबाबतच्या चिंता दूर झाल्या आहेतच, शिवाय त्यांचे जीवनही सोपे झाले आहे. या प्रकल्पाचा सामान्य माणसाच्या जीवनावर सकारात्मक परिणाम झाला आहे. देशातील 12 लाखांहून अधिक नागरिक दररोज जन औषधी केंद्रांमधून औषधे खरेदी करत आहेत. येथे उपलब्ध असलेली औषधे बाजारभावापेक्षा 50 ते 90 टक्के स्वस्त आहेत. इतकेच नाही तर जेव्हा मूत्रपिंडाचा आजार वाढतो तेव्हा डायलिसिस सतत करावे लागते. ते नियमितपणे करावे लागते, दूर जावे लागते, त्यासाठी खूप खर्च येतो. म्हणूनच, केंद्र सरकारने देशातील 700 हून अधिक जिल्ह्यांमध्ये दीड हजारांहून अधिक डायलिसिस केंद्रे उघडली आहेत. येथे मोफत डायलिसिस सुविधा देखील उपलब्ध आहे.

### संवेदनशीलता बनली आरोग्य क्रांतीचा आधार

जुन्या पिढीला हे चांगलेच माहीत आहे की पूर्वी घरात कोणत्याही आजाराची बातमी आली की संपूर्ण कुटुंबावर जणू वीज कोसळत असे. जर एखाद्या गरीब घरातील कोणी गंभीर आजारी पडला तर त्याचा परिणाम कुटुंबातील प्रत्येक सदस्यावर होत असे. एक काळ असा होता ...जेव्हा उपचारांसाठी लोकांना आपली घरे, जमीन, दागिने इत्यादी विकावे लागे. एखाद्या गंभीर आजाराच्या उपचाराचा खर्च ऐकून गरीब व्यक्ती थरथर कापत असे. वृद्ध आई स्वतः उपचार



## पीएम डायलिसिस कार्यक्रमामुळे झाली 8,000 कोटी रुपयांची बचत

**प्रधानमंत्री राष्ट्रीय डायलिसिस कार्यक्रमांतर्गत, देशभरातील 36 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील सुमारे 750 जिल्ह्यांतील 1,674 केंद्रांवर 11,757 हेमो-डायलिसिस मशीन वापरून रुग्णांचे डायलिसिस केले जात आहे. 3 जून 2025 पर्यंत एकूण 27.86 लाख रुग्णांनी डायलिसिस सेवेचा लाभ घेतला आहे. या कालावधीत एकूण 342.25 लाख हेमो-डायलिसिस सत्रे आयोजित करण्यात आली. प्रधानमंत्री राष्ट्रीय डायलिसिस कार्यक्रमाचेच हे फलित आहे की या योजनेद्वारे आतापर्यंत रुग्णांसाठी एकूण 8,000 कोटी रुपयांची बचत झाली आहे.**

करून घ्यायचे की नातवंडांना शिक्षण द्यायचे असा विचार करत असे. वृद्ध वडील स्वतः उपचार करून घ्यायचे की घरचा खर्च भागवायचा असा विचार करत असत. त्यामुळे गरीब कुटुंबातील वडीलधाऱ्यांना एकच मार्ग दिसत असे. शांतपणे वेदना सहन करायच्या. शांतपणे मृत्यूची वाट पाहायची. पैशाअभावी उपचार न मिळाल्याची असहाय्यता. ती असहाय्यता गरिबांना उद्ध्वस्त करून टाकत असते. अशा परिस्थितीत संवेदनशील पंतप्रधान नरेंद्र मोदींना ती वेदना जाणवली आणि त्यातूनच आयुष्मान भारत योजनेचा जन्म झाला.

केंद्र सरकारने असा निर्णय घेतला की गरिबांचा रुग्णालयात दाखल होण्याचा 5 लाख रुपयांपर्यंतचा खर्च सरकार उचलेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून अनेक वेळा म्हटले आहे की - "मला माझे आरोग्य असे हवे आहे की ते देशासाठी ओझे बनू नये. मला शेवटच्या श्वासापर्यंत निरोगी व्यक्ती म्हणून जगायचे आहे." आरोग्याप्रती जागरूक दृष्टिकोन आणि संवेदनशीलता यामुळे आरोग्याला पहिल्यांदाच एखाद्या सरकारच्या विषयपत्रिकेत सर्वोच्च प्राधान्य मिळाले आहे. बऱ्याच काळापासून

देशाची इच्छा होती की गरिबातील गरिबांचीही काळजी घेईल अशी आधुनिक आरोग्यव्यवस्था देशात असावी. अशी आरोग्य व्यवस्था असावी जी गरिबांच्या आरोग्याची काळजी घेईल, गरिबांचे रोगांपासून संरक्षण करेल आणि आजारपणात त्यांना सर्वोत्तम उपचार देईल. चांगली आरोग्य सुविधा व्यवस्था म्हणजे केवळ चार भिंती बांधणे असे नाही. कोणत्याही देशाची आरोग्य व्यवस्था तेव्हाच मजबूत होते जेव्हा ती प्रत्येक प्रकारचा उपाय उपलब्ध करून देते, प्रत्येक पावलावर आधार देते. म्हणूनच, गेल्या 11 वर्षांत देशात समग्र आरोग्य सेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. गेल्या 11 वर्षांत भारतात आरोग्य क्षेत्रात जेवढे काम झाले आहे ते गेल्या 70 वर्षांतही झालेले नाही.

एखाद्या देशातील नागरिक जितके निरोगी असतील तितकाच त्या देशाच्या प्रगतीचा वेग जलद असेल. या विचाराने आपल्या नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देऊन केंद्र सरकारने 2017 च्या आरोग्य धोरणासह सार्वत्रिक आरोग्यसेवेचा एक नवीन उपक्रम सुरू केला. आज आरोग्य क्षेत्रासाठी, गरिबातील गरीब व्यक्तीला आरोग्य सुविधा देण्यासाठी देश एकच नव्हे तर हजारो कोटी रुपयांच्या विक्रमी गुंतवणुकीसह काम करून केवळ उपचारच नाहीत तर, जे लोक दारिद्र्यरेषेखालून बाहेर आले आहेत ते कोणत्याही प्रकारे पुन्हा

# 11 वर्षांमध्ये आरोग्य क्षेत्राने रचला नवा इतिहास

## विक्रमी संख्येत एम्स आणि वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी, आरोग्यावरील भार कमी, आराम आणि सुरक्षिततेत वाढ




सहा आघाड्यांवर देशातील आरोग्य सुविधा मजबूत केल्या जात आहेत.

- पहिली आघाडी - प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देणे.
- दुसरी आघाडी - प्रत्येक गावात लहान आणि आधुनिक रुग्णालय सुरु करणे.
- तिसरी आघाडी - शहरांमध्ये वैद्यकीय महाविद्यालये आणि मोठ्या वैद्यकीय संशोधन संस्था सुरु करणे.
- चौथी आघाडी - देशभरातील डॉक्टर आणि पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे.
- पाचवी आघाडी - रुग्णांना स्वस्त औषधे आणि स्वस्त उपकरणे पुरवणे.
- सहावी आघाडी - तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णांना येणाऱ्या समस्या कमी करणे.

त्यांच्या सुविधांचीही काळजी ते रुग्णालयातून बाहेर पडल्यानंतर दारिद्र्यरेषेखाली जाऊ नये म्हणून सरकार घेत आहे. यासाठी मोफत अन्नधान्याची योजनाही सतत सुरू आहे. केंद्र सरकारच्या प्रयत्नांचे हे फळ आहे की 25 कोटी लोक गरिबीतून बाहेर पडले आहेत आणि एक नवमध्यमवर्ग निर्माण झाला आहे.

### आरोग्य सुरक्षेतील सार्वत्रिक लसीकरणाचे योगदान

गेल्या 11 वर्षांत आरोग्यसेवा भारतातील सर्वात परिवर्तनकारी क्षेत्रांपैकी एक बनली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मजबूत नेतृत्वाखाली देशाने लसीकरण आणि रोग निर्मूलनातील सतत प्रगती पाहिली आहे. आदिवासी गावांमधील नवजात बालकांपासून ते शहरातील शाळकरी मुलांपर्यंत, सरकारचे उद्दिष्ट देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पोहोचणे आणि कोणालाही मागे न सोडणे हे आहे. 2014 पूर्वी भारताला कमी लसीकरण व्याप्ती, क्षयरोगाचे उच्च दर, तसेच महिला आणि मुलांमध्ये व्यापक गोवर, रुबेला, हिवतापासारख्या आजारांचा वारंवार प्रादुर्भाव यासारख्या आव्हानांचा सामना करावा लागत असे. आज 2025 येता येता हे चित्र बदलले आहे, भारत जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आणि यशस्वी आरोग्य मोहिमांपैकी एक आहे. पंतप्रधान मोदींच्या लोक-केंद्रित प्रशासन प्रारूपात सेवा, समर्पण आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची भावना स्पष्टपणे प्रतिबिंबित होते.

पूर्वी कोट्यवधी मुले जीवनरक्षक लसींपासून वंचित राहत होती, हे लक्षात घेऊन 2014 मध्ये मिशन इंद्रधनुष सुरू करण्यात आले. कोणीही लसीकरणाशिवाय राहू नये यासाठी ऑक्टोबर 2024 मध्ये U-WIN पोर्टल सुरू करण्यात आले. आता लसीकरणाचा संपूर्ण रेकॉर्ड डिजिटल झाला आहे. लाईव्ह डॅशबोर्ड आणि एसएमएस अलर्टच्या मदतीने लसीकरण चुकण्याचे प्रमाण कमी झाले आहे. ज्याप्रमाणे आधारने ओळख पारदर्शक बनवली आणि सर्वांशी जोडली, त्याचप्रमाणे U-WIN पोर्टल लसीकरण सोपे, पारदर्शक आणि सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी काम करत आहे.

### भारताच्या आयुषला जागतिक परिमाण

भारत हा दीर्घकाळापासून समग्र आरोग्यसेवेचे ( होलिस्टिक हेल्थकेअर) अग्रगण्य केंद्र राहिला आहे, आयुर्वेद आणि योग यासारख्या पारंपरिक औषध प्रणाली त्याच्या प्राचीन संस्कृतीत आणि सघन ज्ञान-परंपरेत खोलवर रुजलेल्या आहेत. तरीही अनेक दशकांपासून या अमूल्य ज्ञानाकडे आधीच्या सरकारांनी दुर्लक्ष केले आणि मौल्यवान म्हणण्याऐवजी जुने मानले. परंतु सध्याच्या केंद्र सरकारच्या दृष्टिकोनामुळे यात संपूर्ण बदल झाला आहे. त्यांनी भारताच्या पारंपरिक वैद्यकीय वारशाचे अभिमानाने आणि उद्देश्यपूर्वक पुनरुज्जीवन केले आहे. एक ऐतिहासिक क्षण 11 डिसेंबर

2014 रोजी आला जेव्हा संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत भारताने एक नवा इतिहास रचला. यादिवशी 177 देशांनी मिळून 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित करण्याच्या ठरावाला पाठिंबा दिला. ही केवळ योगाभ्यासाला मिळालेली जागतिक मान्यता नव्हती, तर ते त्या क्षणाचे प्रतीक होते जेव्हा भारताने आपला सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा पुन्हा स्वीकारला आणि तो अभिमानाने संपूर्ण जगाला समर्पित केला.

### एक पृथ्वी - एक आरोग्य जागतिक अभियान

आरोग्य हा आपल्या सामायिक प्राधान्यांचा आणखी एक आधारस्तंभ आहे. भारताची आरोग्य विमा योजना - आयुष्मान भारत, सुमारे 60 कोटी लोकांना व्यापते. परंतु आरोग्याची भारताची चिंता केवळ भारतीयांपुरती मर्यादित नाही. भारताचे "एक पृथ्वी, एक आरोग्य" हे ध्येय आरोग्याला एक सामायिक जागतिक जबाबदारी म्हणून पाहते. कोविड महामारीच्या काळात भारत आफ्रिकेसोबत उभा राहिला. त्या काळातही लसी आणि औषधे पुरवण्यात आली. "आरोग्य मैत्री" उपक्रमातही भारताने प्रशिक्षण, रुग्णालये, उपकरणे आणि औषधे यांच्या माध्यमातून आफ्रिकेला पाठिंबा दिला. प्रगत कर्करोग उपचारांसाठी नामिबियाला भाभाट्रॉन रेडिओथेरपी मशीन पुरवण्यास भारत तयार आहे. भारतात विकसित केलेले हे मशीन 15 देशांमध्ये वापरले गेले आहे. या मशीनने वेगवेगळ्या देशांमध्ये कर्करोगाच्या सुमारे पाच लाख गंभीर रुग्णांना मदत केली आहे.

निःसंशयपणे, आयुष्मान भारत योजना ही विकसित भारताच्या ध्येयाकडे नेणारी आरोग्य क्रांती आहे. खरे पाहता अभ्यासातून असे दिसून आले आहे की चांगल्या आरोग्यसेवेमुळे आयुर्मानात एक वर्षाची वाढ झाल्यास जीडीपीमध्ये 4 टक्क्यांपर्यंत वाढ होते. आयुष्मान भारत योजना आठव्या वर्षात प्रवेश करत असतानाही तिचा मुख्य उद्देश कोणताही भारतीय आरोग्य संकटात एकटा राहू नये याची खात्री करणे हाच आहे. विविधतेने नटलेल्या आणि मोठ्या लोकसंख्येच्या देशासाठी ही योजना किती महत्त्वाची आहे हे सहज समजू शकते. आज देश आणि त्याचे नेतृत्व देशातील गरीब आणि मध्यमवर्गीयांना महागड्या उपचारांच्या ओझ्यातून मुक्त करण्यासाठी दृढनिश्चयी आहे. आज देश या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. हा बदल आशेचे प्रतीक आहे जिथे प्रत्येक जीवन महत्त्वाचे आहे आणि उपचार हे कोणाचेही स्वप्न ठरू नये. आयुष्मान भारतने समावेशक आणि सार्वत्रिक आरोग्य सेवेचे असे जागतिक प्रारूप तयार केले आहे जिथे राष्ट्र स्वतः म्हणत आहे - आयुष्मान भव.

> 2014 पूर्वी आरोग्यसेवा हे दुर्लक्षित क्षेत्र होते. आज, तुम्ही श्रीमंत असो वा गरीब, दुर्गम गावात राहणारे असो किंवा महानगरात, तुम्ही अशा व्यवस्थेचा भाग आहात जी परवडणाऱ्या आरोग्यसेवेची हमी देते. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील हा नवा भारत वेगाने 'विकसित भारतात' रूपांतरित होत आहे जिथे आरोग्यसेवा सर्वांसाठी आहे.
>
> **- जे. पी. नड्डा,**
> **केंद्रीय आरोग्य मंत्री**



# बिहारच्या महानतेचे स्मरण करून विकासाचा संदेश



**गयाजी हे भारताच्या शाश्वत श्रद्धेचे प्रतीक तर आहेच पण आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे जिवंत उदाहरण देखील आहे. भगवान विष्णूंच्या वरदानामुळे याला मोक्षभूमी म्हटले गेले आणि भगवान बुद्ध ज्ञान देण्यासाठी बोधगया येथे आले... या पवित्र भूमीच्या महानतेचे स्मरण करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 22 ऑगस्ट रोजी गयाजी इथून बिहारला दिल्या 12 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या भेटवस्तू...**

वारशासह विकास हा आज नवीन भारताच्या विकासाचा मूलमंत्र बनला आहे आणि आधुनिक पायाभूत सुविधा ही त्याची ओळख आहे. विकसित भारताच्या संकल्पाच्या मार्गावर पुढे जाणाऱ्या युगाच्या या गाथेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गयाजीमध्ये एक नवीन अध्याय जोडला. भारताच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेल्या या पवित्र भूमीवर 12 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की ऊर्जा, आरोग्य आणि शहरी विकासाशी संबंधित अशा या प्रकल्पांमुळे बिहारच्या उद्योगांना बळकटी मिळेल.

तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी देखील निर्माण होतील. विकसित भारतासाठी विकसित बिहारच्या गरजेवरील त्यांच्या दृष्टिकोनाचा उल्लेख करताना पंतप्रधान मोदींनी गेल्या 11 वर्षांत झालेल्या बदलांबद्दल सांगितले आणि गरिबांच्या जीवनातील अडचणी दूर करण्यासाठी तसेच महिलांचे जीवन सोपे करण्यासाठी आपल्या वचनबद्धतेचा उल्लेख केला. वाचा पंतप्रधान मोदींच्या भाषणातील 5 ठळक मुद्दे

### 1. सुविधा, सुरक्षा और सन्मानाची हमी

गेल्या 11 वर्षांत 4 कोटींहून अधिक गरीबांना पक्की घरे बनवून देण्यात आली आहेत. पंतप्रधान मोदी म्हणाले की, एकट्या बिहारमध्ये 38 लाखांहून अधिक घरे बांधण्यात आली आहेत. गयाजी जिल्ह्यातही 2 लाखांहून अधिक कुटुंबांना आपले पक्के घर मिळाले आहे. या घरांसोबतच आम्ही गरिबांना त्यांचा स्वाभिमानही दिला आहे. या घरांमध्ये वीज, पाणी, शौचालय आणि गॅस जोडणीच्या सुविधा देण्यात आल्या आहेत. याचा अर्थ गरीब कुटुंबांनाही सुविधा, सुरक्षितता आणि सन्मानाने जगण्याची हमी मिळाली आहे.

### 2. बिहारच्या भूमीतून 'ऑपरेशन सिंदूर'चा संकल्प साकार

जम्मू - काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर मधुबनी येथे आयोजित कार्यक्रमात त्यांनी केलेल्या भाषणाची आठवण करून देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की बिहार ही चंद्रगुप्त मौर्य आणि चाणक्य यांची भूमी आहे. जेव्हा जेव्हा कोणत्याही शत्रूने भारताला आव्हान दिले आहे तेव्हा बिहार देशासाठी ढाल बनून उभा राहिला आहे. जेव्हा पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला, आपल्या निष्पाप नागरिकांना त्यांचा धर्म विचारून मारण्यात आले, तेव्हा मी बिहारच्या या भूमीतून दहशतवाद्यांचा नायनाट करण्याबद्दल बोललो होतो. आज जग पाहत आहे की बिहारच्या या भूमीतून घेतलेला संकल्प पूर्ण झाला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने भारताच्या संरक्षण धोरणाची एक नवीन लक्ष्मणरेषा आखली आहे.

### 3. भ्रष्टाचार आता सहन केला जाणार नाही

भ्रष्टाचाराविरुद्धच्या आपल्या लढाईचा उल्लेख करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, 2014 पासून पंतप्रधान असताना त्यांच्या कारकिर्दीत भ्रष्टाचाराचा एकही डाग लागलेला नाही.




भारतीय संविधान प्रत्येक लोकप्रतिनिधीकडून प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेची अपेक्षा करते. याच कारणामुळे आपले सरकार एक कठोर भ्रष्टाचार विरोधी कायदा आणत आहे ज्याच्या कक्षेत पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्री देखील येतील,असे ते म्हणाले. जर कोणी कारागृहात गेले तर 30 दिवसांच्या आत जामीन मिळवावा लागेल. जर जामीन मंजूर झाला नाही तर त्यांना 31 व्या दिवशी त्यांचे पद सोडावे लागेल. आज कायदा असा आहे की जर एखाद्या कनिष्ठ सरकारी कर्मचाऱ्याला 50 तास कोठडीत ठेवले तर तो आपोआप निलंबित होतो. मात्र मुख्यमंत्री, मंत्री किंवा पंतप्रधान तुरुंगात असतानाही सत्तेचे विशेषाधिकार कसे काय उपभोगू शकतात, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.



## 4. बिहार आता नवीन प्रगतीपथावर

निरक्षरता आणि बेरोजगारीमुळे एकेकाळी स्थलांतराचा फटका सहन करणाऱ्या बिहार राज्याच्या विकास प्रवासाचा आराखडा सादर करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकांना जुन्या काळाची आठवण करून दिली. ते म्हणाले की, एका मुख्यमंत्र्यांनी व्यासपीठावरून सांगितले होते की ते बिहारमधील लोकांना त्यांच्या राज्यात येऊ देणार नाहीत. सरकार आता अशा मोहिमांना बिहारच्या विकासाने प्रतिसाद देत आहे. गेल्या काही वर्षांत जुन्या समस्यांवर उपाय शोधले गेले आहेत आणि प्रगतीचे नवीन मार्ग देखील तयार झाले आहेत. बिहारच्या मुलांना आणि मुलींना येथे रोजगार मिळावा, त्यांना सन्मानाचे जीवन मिळावे आणि त्यांना त्यांच्या पालकांची काळजी घेता यावी, या विचाराने सरकार काम करत आहे.

## 5. भारतातील सुविधांवर भारतीयांचाच अधिकार

देशाच्या लोकसंख्याशास्त्रीय बदलांचा उल्लेख करुन पंतप्रधान म्हणाले की हा धोका बिहारला देखील आहे. देशात घुसखोरांची वाढती संख्या ही चिंतेची बाब आहे. बिहारच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये लोकसंख्याशास्त्रीय बदल वेगाने होत आहेत. म्हणूनच, एनडीए सरकारने निर्णय घेतला आहे की आम्ही घुसखोरांना देशाचे भविष्य ठरवू देणार नाही. भारतीय नागरिकांसाठी असलेल्या सुविधा घुसखोरांना लुटू दिल्या जाणार नाहीत. या धोक्याचा सामना करण्यासाठी, आपण डेमोग्राफी मिशन सुरू करण्याची घोषणा केल्याचे पंतप्रधान म्हणाले. ही योजना लवकरच कार्यान्वित होईल, प्रत्येक घुसखोराला देशातून हाकलून लावले जाईल, असे त्यांनी निक्षून सांगितले.





# बिहारच्या समृद्धीचा महासेतू: औंटा आणि सिमरिया पुलासह अनेक प्रकल्पांची भेट

**1,870** कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च

**8.15** किमी लांबीचा पूल

- मोकामाच्या औंटा आणि बेगुसरायच्या सिमरिया दरम्यान नवीन पुलाच्या बांधकामामुळे मधुबनी, सुपौल, अररिया, बेगुसराय या दक्षिण बिहारमधील शेखपुरा, नवादा, लखीसराय या शहरांना उत्तम कनेक्टिविटी लाभेल. यामध्ये गंगा नदीवरील 1.86 किमी लांबीच्या 6-लेन पुलाचाही समावेश आहे.
- जुना मोडकळीला आलेला "राजेंद्र सेतू" अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता, त्यामुळे या वाहनांना 100 किमी पेक्षा जास्त अतिरिक्त प्रवास करावा लागत होता. आता हे अंतर फक्त 8 किमी इतकेच असेल. वाहतूक कोंडीपासून सुटका मिळेल. बरौनी थर्मल प्लांट, रिफायनरी, सुधा डेअरीसह स्थानिक उद्योग आणि कृषी क्षेत्र मजबूत होईल.

- गयाजी ते दिल्ली दरम्यान अमृत भारत एक्सप्रेस तसेच वैशाली आणि कोडरमा दरम्यान बौद्ध सर्किट ट्रेनला हिरवा झेंडा. यामुळे आधुनिक सुविधा, आरामदायक प्रवास आणि सुरक्षिततेसह जागतिक स्तरावर सांस्कृतिक वारशाला एक नवीन ओळख मिळेल.
- बक्सर मध्ये सुमारे 6,900 कोटी रुपयांच्या 1,320 मेगावॅट औष्णिक वीज प्रकल्पातील 660 मेगावॅट क्षमतेच्या पहिल्या युनिटचे उद्घाटन. यामुळे रोजगाराच्या संधी, औद्योगिक विकास आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळेल.
- मुझफ्फरपूर येथे होमी भाभा कर्करोग रुग्णालय आणि संशोधन केंद्राचे उद्घाटन. या केंद्रात प्रगत ऑन्कोलॉजी ओपीडी, आयपीडी वॉर्ड, ऑपरेशन थिएटर, आधुनिक प्रयोगशाळा, रक्तपेढी आणि 24 खाटांचा आयसीयू (इंटेन्सिव्ह केअर युनिट) आणि एचडीयू (हाय डिपेंडन्सी युनिट) यांचा समावेश आहे.
- अत्याधुनिक सुविधा असलेले हे रुग्णालय बिहार आणि पूर्व भारतातल्या रुग्णांसाठी एक आशेचा किरण ठरेल. निम्न आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी हा एक मोठा आधार असेल.



पीएम आवास योजनेअंतर्गत 1,600 हून अधिक कुटुंबांना मिळाले घरकुल

| शहरी भागात | ग्रामीण भागात |
|---|---|
| 4,260 | 12,000 |

लाभार्थ्यांनी केला आहे गृहप्रवेश

पाच प्रमुख लाभार्थ्यांना सुपूर्द केली घराची प्रतीकात्मक चावी.

### जलप्रकल्प

नमामि गंगे कार्यक्रमाअंतर्गत मुंगेर येथे बांधलेल्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) आणि सांडपाणी नेटवर्कचे उद्घाटन. औरंगाबाद, बोधगया आणि जहानाबादला मिळाली पाणीपुरवठा प्रकल्पाची भेट.

- NH 31 बख्तियारपूर ते मोकामा या चौपदरी रस्त्याचे उद्घाटन

हा नवभारत आहे जो आधुनिक पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी दररोज नवीन मानके स्थापित करत आहे आणि अंत्योदयाच्या विचारधारेनुसार गरीब, महिला, शेतकरी आणि युवकांना सन्मान आणि प्रतिष्ठेचे जीवन जगण्याचा अधिकार प्रदान करत आहे. जिथे वारसा जपण्याचा संकल्प असतो, तिथे काहीतरी नवीन निर्माण करण्याची क्षमता देखील असते. जिथे प्रत्येक राज्याच्या विकासात संपूर्ण भागीदारीसह विकसित भारताच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या दूरदृष्टीसह आज बिहार देखील प्रगतीपथावर मार्गक्रमण करत आहे. त्यासाठी केंद्र सरकार बिहारच्या युवकांच्या स्वप्नांची पूर्तता करण्याबरोबरच लोकांच्या आकांक्षांना नवीन पंख देण्याच्या दिशेने आगेकूच करत आहे.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

# आत्मनिर्भर भारताच्या संकल्पाला गती देत आहे गुजरात

**भारताच्या औद्योगिक विकासाचा अग्रणी बनणारा गुजरात गेल्या सुमारे तीन दशकांमध्ये जागतिक स्तरावरील पायाभूत सेवा सुविधा, उद्योगस्नेही धोरणे आणि मजबूत परिचालनात्मक नेटवर्कमुळे देशातील आणि परदेशातील गुंतवणूकदारांचे पसंतीचे स्थान बनले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये गुजरातने केवळ मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांचेच लक्ष वेधले नाही तर उत्पादक, अक्षय ऊर्जा आणि स्टार्टअप क्षेत्रातही अभूतपूर्व गुंतवणुकीला आकर्षित केले आहे. याच प्रयत्नांना आणखी पुढे नेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बापूजींच्या भूमीवरून 5,400 कोटी रुपयांपेक्षा अधिक विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली.**

असे म्हणतात की गाव, शेतकरी, महिला आणि मध्यमवर्गीयांच्या वेदना फक्त त्यांनाच समजू शकतात ज्यांनी स्वतः त्यांच्यात राहून त्यांच्या संघर्षाची धग सहन करून स्वतःचा मार्ग तयार केला आहे. वडनगर सारख्या छोट्याश्या गावापासून ते गुजरातच्या मुख्यमंत्रीपदापर्यंत आणि भारताच्या पंतप्रधान पदापर्यंतचा प्रवास करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या दृष्टिकोनात भूतकाळातील संघर्ष आणि आव्हानांशी संबंधित अनेक अनुभव सामावलेले आहेत.






वर्ष 2001 मध्ये झालेल्या विनाशकारी भूकंपानंतर कोलमडून गेलेल्या गुजरातला या अवस्थेतून बाहेर काढून देशासाठी विकासाचे मॉडेल म्हणून स्थापित करण्यासाठी मुख्यमंत्री म्हणून त्यांनी ठोस पावले उचलली यातूनच त्यांचे दृष्टिकोन स्पष्ट होत आहेत. गुजरातकडून मिळालेली शिकवण आणि देशासह राज्याचा विकास करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीची ही झलक त्यांच्या 25 आणि 26 ऑगस्टच्या दोन दिवसीय दौऱ्यातही दिसून आली. पंतप्रधान म्हणाले की गुजरातने आपल्याला जे शिकवले ते देशाच्या विकासासाठी उपयोगी ठरत आहे, हा एक योगायोग आहे. आपल्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात पंतप्रधानांनी अहमदाबाद येथे 5,400 कोटी रुपयांपेक्षा अधिक विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली ज्यात 1,400 कोटी रुपयांच्या अनेक रेल्वे प्रकल्पांचा देखील समावेश आहे. तर दुसऱ्या दिवशी, सुझुकीने हंसलपूर येथे ग्रीन मोबिलिटी उपक्रमांतर्गत भारतात उत्पादित केलेल्या पहिल्या इलेक्ट्रिक कारला त्यांनी हिरवा झेंडा दाखवला आणि TDSG लिथियम-आयन बॅटरी प्लांटमध्ये हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोडचे उत्पादन देखील सुरू झाले.

औद्योगिक विकासाच्या बरोबरच आत्मनिर्भर भारताला गुजरातने दिलेल्या योगदानाचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले की एक काळ असा होता की लोक या राज्याकडे काहीच नाही असे टोमणे मारत असत, मात्र आता गुजरातच्या या भूमीवर प्रत्येक प्रकारच्या उद्योगांचा विस्तार होत आहे. दाहोद येथील रेल्वे कारखान्यात शक्तिशाली इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह इंजिने तयार केली जात आहेत, मेट्रो डबे इतर देशांमध्ये निर्यात केले जात आहेत. गुजरातमध्ये मोटारसायकली आणि मोटारींचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होत आहे. गुजरातने आधीच विविध विमान घटकांचे उत्पादन आणि निर्यात करायला सुरुवात केली असून वडोदरा मध्ये आता परिवहन विमानांचे उत्पादन सुरू झाले आहे. स्टॅच्यू ऑफ युनिटी प्रमाणे गुजरात मधील केवाडिया येथील सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्मारक देश आणि जगासाठी प्रेरणेचे केंद्र बनले आहे. अहमदाबादमधील साबरमती नदी जी पूर्वी कोरडी होती, ती आता साबरमती नदीकाठ म्हणून गौरवली जात आहे.

अहमदाबादमध्ये झालेल्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण केले. गुजरात ही दोन मोहनांची भूमी आहे हे अधोरेखित करून पंतप्रधानांनी सांगितले की त्यापैकी एक आहेत सुदर्शनचक्रधारी मोहन आणि दुसरे चरखाधारी मोहन म्हणजेच साबरमतीचे संत राष्ट्रपिता महात्मा

## बापूंच्या भूमीवरून पुन्हा एकदा स्वदेशीचा नारा

**पंतप्रधान म्हणाले - या सणासुदींना केवळ स्वदेशी वस्तूंचीच खरेदी करा.**

नवरात्र, विजयादशमी, धनत्रयोदशी आणि दिवाळी या आगामी सणांचा उल्लेख करुन पंतप्रधानांनी पुन्हा एकदा आवाहन केले की देशवासियांनाही मी पुन्हा पुन्हा आग्रह करतो आहे, आपल्याला आयुष्यात एक मंत्र तयार करायचा आहे, आपण जे काही खरेदी करू, ते मेड इन इंडिया असेल, स्वदेशी असेल. मी व्यापाऱ्यांना सांगू इच्छितो की, या देशाला पुढे नेण्यात तुम्ही खूप मोठे योगदान देऊ शकता. तुम्ही निश्चय करा, परदेशी माल विकणार नाही आणि मोठ्या अभिमानाने फलक लावा की माझ्याकडे स्वदेशी विकले जाते.

## 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'चा पाया गुजरातमध्ये घातला गेला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरदारधाम मुलींच्या वसतिगृहाच्या दुसऱ्या टप्प्याची पायाभरणी केली. यादरम्यान, एका व्हिडिओ संदेशाद्वारे त्यांनी राज्याचा मुख्यमंत्री म्हणून केलेल्या त्यांच्या कार्यकाळातील कामगिरीचे स्मरण केले, जी नंतर बेटी बचाओ-बेटी पढाओ मोहिमेचा पाया बनली. पंतप्रधान म्हणाले की, त्यावेळी राज्यात मुलींना शाळेत न पाठवणे आणि शाळेतून गळतीचे प्रमाण खूप जास्त असणे अशी आव्हाने समोर होती. शाळांमधील पायाभूत सुविधांपासून ते इतर अनेक सुविधांपर्यंत, सर्व सुधारणा करण्यात आल्या. भ्रूणहत्येचा कलंक दूर करण्यासाठी एक चळवळ सुरू करण्यात आली. शक्तीचा उपासक असलेल्या गुजरातमध्ये 'मुलगा आणि मुलगी समान' या मोहिमेला बळकटी दिली. गुजरातचे हे बीज आज बेटी बचाओ-बेटी पढाओच्या रूपात देशात एक जनआंदोलन बनले आहे.






# मेक इन इंडिया मोहिमेत नवा अध्याय

## आता गुजरातमधून 100 हून अधिक देशांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांची निर्यात केली जाईल

मेक इन इंडिया मेक फॉर द वर्ल्ड च्या भारताच्या प्रवासात 26 ऑगस्ट रोजी एक नवा अध्याय लिहिला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदाबादमधील हंसलपूर येथील सुझुकीच्या पहिल्याच जागतिक धोरणात्मक बॅटरी विद्युत वाहनाचे लोकार्पण करत त्याला झेंडा दाखवला.

पंतप्रधानांच्या हस्ते अहमदाबादमधील हंसलपूर येथील सुझुकी मोटर प्रकल्पात दोन ऐतिहासिक टप्प्यांचे उद्घाटन झाले. हे महत्त्वाचे उपक्रम पंतप्रधानांच्या मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारताच्या वचनबद्धतेला पुढे नेत भारताच्या हरित गतिशीलतेसाठी जागतिक केंद्र म्हणून उदयास आले असल्याचे अधोरेखित करतात.

मेक इन इंडियाच्या यशस्वीतेचे मोठे उदाहरण म्हणजे पंतप्रधानांनी "ई-विटारा"या सुझुकीच्या पहिल्याच जागतिक धोरणात्मक बॅटरी विद्युत वाहनाचे लोकार्पण करत त्याला झेंडा दाखवला. ही विद्युत वाहने युरोप आणि जपानसह जगातील शंभराहून अधिक देशांना निर्यात केली जाणार आहेत. यामुळे भारत आता सुझुकीसाठी विद्युत वाहनांचे जागतिक उत्पादन केंद्र म्हणून उदयास येईल. या प्लांटची पायाभरणी पंतप्रधान मोदी यांनी 2012 मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री असताना केली होती. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारतात लोकशाहीची ताकद, लोकसंख्याशास्त्रीय फायदा आणि कुशल कामगारांचे मोठे भांडार आहे जो प्रत्येक भागीदारासाठी लाभदायी आहे. जपानची सुझुकी ही कंपनी भारतात उत्पादन घेत असून, इथे उत्पादित होणारी वाहने पुन्हा जपानमध्ये निर्यात केली जात आहेत, या संपूर्ण घडामोडीतून भारत आणि जपानमधील संबंधांच्या सामर्थ्यासोबतच जागतिक कंपन्यांचा भारतावर वाढता विश्वासही दिसून येतो

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम बघण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

- पंतप्रधानांनी गुजरातमधील टीडीएस लिथियम-आयन बॅटरी प्रकल्पात हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोडच्या स्थानिक उत्पादनाचे उदघाटन करून भारताच्या बॅटरी परिसंस्थेच्या पुढील टप्प्याचे उद्घाटन केले.
- हा प्रकल्प तोशिबा, डेंसो आणि सुझुकी यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन झाला आहे.
- इलेक्ट्रिक वाहन प्रणाली आणि निर्मिती परिसंस्थेत बॅटरी हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे.
- काही वर्षांपूर्वी भारतात बॅटरी पूर्णपणे आयात केली जात होती, अशा वेळी इलेक्ट्रिक वाहनांच्या उत्पादनाला बळकटी देण्यासाठी देशांतर्गत बॅटरी उत्पादन सुरू करणे ही भारताची गरज होती
- याच दृष्टीकोनातून 2017 मध्ये टीडीएसजी (TDSG) बॅटरी प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. आता तीन जपानी कंपन्या भारतात पहिल्यांदाच एकत्रितपणे बॅटरी सेल्सचे उत्पादन करणार आहेत.
- आता भारतातच स्थानिक पातळीवर बॅटरी सेल इलेक्ट्रोड्सचे उत्पादनही घेतले जाणार आहे.
- यामुळे भारताच्या स्वावलंबनाला नवीन बळ मिळेल. यामुळे हायब्रिड इलेक्ट्रिक वाहनांच्या व्यवसायाला गती मिळेल.

गांधी. सुदर्शन-चक्रधारी मोहन यांनी आपल्याला राष्ट्र आणि समाजाचे रक्षण कसे करायचे हे शिकवले असे प्रतिपादन त्यांनी केले. ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या सशस्त्र दलांच्या शौर्याचे आणि सुदर्शन-चक्रधारी मोहन यांच्या प्रेरणेने देशाच्या दृढनिश्चयाचे प्रतीक बनले. त्याचप्रमाणे चरखाधारी मोहन यांनी स्वदेशीच्या माध्यमातून भारताच्या समृद्धीचा मार्ग दाखवला. म्हणूनच, जेव्हा जग आर्थिक स्वार्थी राजकारणाच्या काळातून जात आहे, तेव्हा गांधींच्या भूमीवरून त्यांनी पुन्हा एकदा स्वदेशीचे आवाहन केले आणि लघु उद्योजक, छोटे दुकानदार, शेतकरी आणि पशुपालकांना आश्वासन दिले की केंद्र सरकार त्यांचे कोणतेही नुकसान होऊ देणार नाही. कितीही दडपण आले तरी ते सहन करण्याची तुमची ताकद वाढतच राहील.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम बघण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



# कोलकात्याच्या विकासाला मेट्रोचा नवा वेग

पश्चिम बंगाल हा भारताच्या सोनेरी इतिहासाच्या गाथेचा केवळ एक भाग नव्हे तर समृद्ध भविष्याचा पाया आहे. यामुळेच 'पूर्वोदयातून भारताचा उदय' या केंद्र सरकारच्या संकल्पात 'विकसित बंगाल'ची संकल्पनाही अंतर्भूत आहे. याच दृष्टिकोनातून केंद्र सरकारने गेल्या अकरा वर्षात पश्चिम बंगाल मध्ये आधुनिक पायाभूत सेवा सुविधा आणि कनेक्टिव्हिटी साठी निरंतर कार्य केले आहे. या दिशेने एक पाऊल पुढे टाकत, 22 ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली कोलकाता मेट्रो रेल्वेच्या तीन नवीन विभागांसह 5,200 कोटी रुपयांची भेट ..

राजधानी दिल्लीतील गजबजलेल्या प्लॅटफॉर्मपासून ते सूरत आणि भोपाळच्या उदयोन्मुख रेल्वे मार्गांपर्यंत, मेट्रो शांतपणे एका नवीन भारताचे वस्त्र विणत आहे. मेट्रोची वाहतूक केवळ जलदच नाही तर स्वच्छ देखील आहे. भविष्यातील भारताची ही जीवनरेखा आहे, ज्याला प्रगतीच्या मार्गावर असलेला देश आपल्या सार्वजनिक वाहतुकीचा कणा बनवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा परिस्थितीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील मेट्रोचा प्रारंभ बिंदू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पश्चिम बंगालला कोलकाता मेट्रोच्या 3 नवीन विभागांची भेट दिली. 7 नवीन स्थानकांना जोडणाऱ्या या विभागांची एकूण लांबी 13.61 किमी आहे. त्यांनी हावडा स्थानकाला जोडणाऱ्या सबवेच्या उद्घाटनासोबत सहा पदरी उन्नत कोना एक्सप्रेसवेची पायाभरणीही केली.

आधुनिक कनेक्टिव्हिटीच्या दिशेने पश्चिम बंगालला दिलेल्या या प्रकल्पांसह, नवीन भारताच्या उभारणीत पायाभूत सुविधांचे महत्त्व सांगून, पंतप्रधान म्हणाले की, भारत 2030 मध्ये जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा वेळी कोलकातासारख्या शहरांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचा संदेश मेट्रोच्या उद्घाटन आणि महामार्गाच्या पायाभरणीपेक्षाही मोठा आहे. आजचा भारत आपल्या शहरांचा कसा कायापालट करत आहे याची ही घटना साक्ष देते. जगातील तिसरे सर्वात मोठे मेट्रो नेटवर्क आता भारतात आहे हे ऐकून सर्वांना अभिमान वाटतो.



**कोलकाता मध्ये सातपट वेगाने मेट्रो संचारमार्गाचा झाला विस्तार**

# रेल्वे - महामार्गांना देखील लाभली गती

कोलकातामध्ये मेट्रो प्रकल्प 1972 मध्ये सुरू झाला, 1984 मध्ये पहिल्या 3.4 किमी मार्गावर सेवा सुरू झाल्या. तेव्हापासून, सुमारे 70 किमी मेट्रो रेल्वे बांधण्यात आली आहे. 2027 पर्यंत 130 किमी मेट्रो नेटवर्क पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.




- गेल्या दशकात, पश्चिम बंगालमध्ये पूर्णपणे किंवा अंशतः येणारे सुमारे 68 हजार कोटी रुपये किमतीचे 4,400 किमी पेक्षा जास्त लांबीचे 42 रेल्वे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी 1,702 किमी लांबीचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.
- पश्चिम बंगालमध्ये 286 किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गांच्या 34 प्रकल्पांवर काम सुरू आहे. त्यासाठी सुमारे 10,900 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**देशभरात रस्ते, रेल्वे, हवाई आणि जलमार्गात वाढली कनेक्टिव्हिटी**

| क्षेत्र | आता 2025-26 | पूर्वी 2013-14 |
|---|---|---|
| मेट्रो | 24 शहरे 1,050 किमी लांबी | 5 शहरे 248 किमी लांबी |
| मेट्रो बांधकाम | 6 किमी मासिक | 680 मीटर मासिक |
| मेट्रो प्रवासी संख्या | 1.12 कोटी दैनिक | 28 लाख दैनिक |
| रेल्वे मार्ग विद्युतीकरण | 40 हजार किमी पेक्षा अधिक | 20 हजार किमी |
| विमानतळ | 160 | 74 |
| जलमार्ग | 30 | 3 |



## आधुनिक कनेक्टिव्हिटीला जीवनसंजीवनी

- कोलकाता मेट्रोमध्ये जोडण्यात आलेल्या 3 नवीन विभागांमध्ये एस्प्लेनेड - सियालदाह दरम्यान 2.45 किमी, नोआपारा ते जय हिंद विमानतळाला जोडणारा 6.77 किमी आणि रुबी - बेलेघाटा दरम्यान 4.39 किमीचा समावेश आहे.
- नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रथमच नोआपारा-जय हिंद विमानतळ विभागाद्वारे थेट मेट्रो सेवेशी जोडले गेले आहे. या नवीन भागांमुळे मेट्रो आता अशा ठिकाणी देखील पोहोचेल जिथे याआधी रस्तेमार्गाने जाण्यासाठी पाऊण ते एक तास लागत असे.
- 1,200 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या 7.2 किमी लांबीच्या सहा पदरी कोना उन्नत द्रुतगती मार्गामुळे हावडा, आसपासचा ग्रामीण भाग आणि कोलकाता दरम्यानची कनेक्टिविटी वाढेल.

## देशातील साधनसंपत्तीवर भारताच्या नवयुवकांचा अधिकार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसंख्याशास्त्रीय आव्हाने आणि घुसखोरांच्या समस्येचा देखील उल्लेख केला. ते म्हणाले की आज ज्या देशांना विकसित म्हटले जाते, ज्या देशांकडे साधनसंपत्ती अगणित आहे, त्यांनी घुसखोरांविरुद्ध मोहीम उघडली आहे. भारताकडे तर मर्यादित स्रोत आहेत. आपल्याला आपल्या नवयुवकांना रोजगार द्यायचा आहे. जे घुसखोर आमच्या नवयुवकांचे रोजगार हिसकावून घेत आहेत, जे आमच्या भगिनी आणि मुलींवर अत्याचार करत आहेत, अशा घुसखोरांना आम्ही भारतात राहू देणार नाही.

21 व्या शतकातील भारताला 21 व्या शतकातील वाहतूक प्रणालीची देखील आवश्यकता आहे.म्हणूनच आज देशात रेल्वे पासून रस्त्यांपर्यंत, मेट्रो पासून विमानतळापर्यंत, आधुनिक वाहतूक सुविधा विकसित करुन त्या एकमेकांशी जोडल्या जात आहेत.

आज पश्चिम बंगालचा देशातील अशा राज्यांच्या यादीत समावेश झाले आहे जिथे रेल्वेचे शंभर टक्के विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासूनची पुरुलिया ते हावडा दरम्यान मेमू ट्रेनची मागणी सरकारने पूर्ण केली आहे.

पश्चिम बंगालमधील वेगवेगळ्या मार्गांवर नऊ वंदे भारत रेल्वे गाड्या धावत असून त्यात दोन अमृत भारत रेल्वे गाड्या देखील चालवल्या जात आहेत.

कोलकाता येथे झालेल्या दुसऱ्या एका जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, जोपर्यंत पश्चिम बंगालची ताकद वाढत नाही तोपर्यंत विकसित भारताच्या दिशेने सुरु असलेला प्रवास यशस्वी होणार नाही. "आम्ही म्हणतो, बांग्लार उदोय तबेई, विकोशितो भारोतेर जॉय!" म्हणूनच गेल्या 11 वर्षांत, केंद्र सरकारने पश्चिम बंगालच्या विकासासाठी नेहमीच सर्व प्रकारची मदत केली आहे. ■

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम बघण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

# विकसित राष्ट्राचा आधार आत्मनिर्भर भारत



**आज जागतिक स्तरावर भारताची अर्थव्यवस्था एक मजबूत आधारस्तंभ बनली आहे. जगात आर्थिक अनिश्चिततेचे वातावरण असताना, भारताची अर्थव्यवस्था स्थिरतेसह वेगाने पुढे जात आहे. मागच्या दशकातील भारतीय सरकारच्या धोरणांचे परिणाम म्हणजे, जागतिक विकासात भारताचे योगदान नजीकच्या भविष्यात 20% पर्यंत पोहोचेल; अशी अपेक्षा तज्ज्ञांना आहे. 23 ऑगस्ट रोजी झालेल्या 'इकॉनॉमिक टाईम्स वर्ल्ड लीडर्स फोरम'मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की रिफॉर्म, परफॉर्म, ट्रान्सफॉर्म अर्थात सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तन या मंत्रासह आगेकूच करणाऱ्या भारताकडे काळाचा मार्ग बदलण्याची शक्ती आहे...**

> 'रिफॉर्म, परफॉर्म, ट्रान्सफॉर्म या मंत्रासह भारताची आगेकूच.. आज अशी स्थिती आहे की तो अवघ्या जगाला विकासाच्या संथ गतीतून बाहेर काढू शकेल."
>
> -नरेंद्र मोदी, पंतप्रधान

जागतिक अर्थव्यवस्थेची सध्याची स्थिती पाहता भारतीय अर्थव्यवस्थेची वाढलेली ताकद, स्पष्ट दिसते आहे. भारत सध्या जगातील सर्वात वेगाने वाढणारी मुख्य अर्थव्यवस्था आहे आणि लवकरच ती तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. भारत एक मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. 23 ऑगस्ट रोजी दिल्ली येथे 'इकॉनॉमिक टाईम्स वर्ल्ड लीडर्स मंचा'चे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, एखाद्या अर्थव्यवस्थेची मूलभूत तत्त्वे मजबूत असतील तर त्याचा प्रभाव सर्व क्षेत्रांवर दिसून येतो. देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते आहे, रोजगाराच्या संधीही वाढत आहेत. हे या आकडेवारीवरून देखील समजू शकते. जून महिन्यात ईपीएफओ डेटाबेसमध्ये 22 लाख औपचारिक नोकऱ्यांची भर पडली, ही एका महिन्यातील आजवरची सर्वात जास्त संख्या आहे. वर्ष 2017 नंतर भारतातील किरकोळ महागाई सर्वात कमी पातळीवर आहे आणि भारताचा परकीय चलन साठा आता पर्यंतच्या उच्चांकावर पोहोचला आहे.

## आत्मनिर्भर भारताकडून जागतिक गरजांची पूर्तता

### भारताची इलेक्ट्रॉनिक्स निर्यात



स्वातंत्र्यानंतर जवळपास 65 वर्षांत अंदाजे **35** हजार कोटी रुपये होती.

ती आता **3.25** लाख कोटी रुपये झाली आहे.

### भारताची ऑटोमोबाईल निर्यात



पूर्वी दरवर्षी सुमारे **50** हजार कोटी रुपये होती.

आता एका वर्षात ती **1.2** लाख कोटी रुपये झाली आहे.

- 100 देशांना इलेक्ट्रिक वाहनांची निर्यात करून भारत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठण्याच्या तयारीत आहे.
- 2014 पासून संशोधन आणि विकासावरील खर्च दुप्पट झाला आहे, तर दाखल केलेल्या पेटंटची संख्या 17 पट वाढली आहे.
- 1 लाख कोटी रुपयांच्या संशोधन विकास आणि नवोन्मेष योजनेला मंजुरी देण्यात आली आहे.
- गेल्या वर्षी भारताने 4 लाख कोटी रुपयांची कृषी उत्पादने निर्यात केली.
- गेल्या वर्षी, जागतिक स्तरावर उत्पादित केलेल्या 800 कोटी लसीच्या डोसांपैकी 400 कोटी डोस भारतात तयार करण्यात आले होते.

### भारताच्या अंतराळ मोहिमा



1979 ते 2014 पर्यंत **42** मोहिमा राबवल्या.

गेल्या 11 वर्षात **60** पेक्षा जास्त मोहिमा पूर्ण केल्या आहेत.

2014 मध्ये भारतात फक्त एकच अंतराळ स्टार्टअप होता, तर आज **300** पेक्षा जास्त आहेत.

2014 या वर्षात भारताची सौर पीव्ही मॉड्यूल उत्पादन क्षमता सुमारे 2.5 गिगावॅट होती, तर सध्या ती 1000 गिगावॅटपर्यंत पोहोचली आहे. दिल्ली विमानतळ 100 दशलक्षां (प्रवासी) पेक्षा जास्त प्रवासी संख्येच्या जागतिक विमानतळांच्या क्लबमध्ये सामील झाले आहे. जगभरात असे फक्त सहा विमानतळ आहेत.

आपल्याकडे 'गाडी चुकली' या नेहमी वापरल्या जाणाऱ्या वाक्याचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले की, जर संधींचा फायदा घेतला नाही तर त्या कशा हातून निसटतात. त्याचप्रमाणे भारतातील यापूर्वीच्या सरकारांनी तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रात अशा अनेक संधी गमावल्या. ते म्हणाले की, ही कोणावरही टीका नाही तर लोकशाहीमध्ये केलेले तुलनात्मक विश्लेषण अनेकदा परिस्थिती अधिक प्रभावीपणे स्पष्ट करण्यास मदत करते. 2014 नंतर भारताने आपला दृष्टिकोन बदलला आणि आता कोणतीही संधी गमावू नये, असा संकल्प केला. भारताने केवळ 'मेड-इन-इंडिया 5जी' निर्माण नाही तर ते देशभरात सर्वात जलद गतीने लागू सुद्धा केले. आता भारत 'मेड-इन-इंडिया 6जी' तंत्रज्ञानावर वेगाने काम करत आहे. भारतात सेमीकंडक्टरशी संबंधित कारखाने उभारले जात आहेत.

मोठी झेप घेऊन पुढे जाणे, हे भारताचे ध्येय आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की भारतातील सुधारणा कोणत्याही सक्तीमुळे किंवा कोणत्याही संकटामुळे होत नाहीत. या सुधारणा भारताच्या वचनबद्धतेचे आणि दृढनिश्चयाचे प्रतिबिंब आहेत. अनावश्यक कायदे रद्द करणे, नियम आणि प्रक्रिया सुलभ करणे यासारख्या प्रमुख पावलांचा उल्लेख करत ते म्हणाले की, प्रक्रिया आणि मंजुरी डिजिटल केल्या जात आहेत. अनेक तरतुदी गुन्हेगारीमुक्त केल्या जात आहेत. जीएसटी प्रणाली सुलभ करण्यासाठी काम केले जात आहे, ज्यामुळे किंमती देखील कमी होतील.

वर्ष 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्यासाठी भारत पूर्णपणे वचनबद्ध आहे. विकसित भारताचा पाया हा स्वावलंबी भारत आहे आणि त्याचे मूल्यांकन तीन निकषांवर केले पाहिजे... वेग, प्रमाण आणि व्याप्ती. जागतिक साथरोगाच्या काळात भारताने या तिन्ही क्षेत्रांमध्ये चांगली कामगिरी केली. या काळात, जेव्हा जीवनावश्यक वस्तूंची मागणी अचानक वाढली आणि जागतिक पुरवठा थांबला, तेव्हा भारताने देशांतर्गत जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी अनेक निर्णायक पावले उचलली. जग भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील गती, प्रमाण आणि व्याप्तीवर देखील लक्ष ठेवून आहे. भारताने 2030 पर्यंत आपल्या एकूण वीज क्षमतेपैकी 50 टक्के वीज जीवाश्मेतर इंधनापासून निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवले होते, ते वेळापत्रकाच्या पाच वर्षे आधीच साध्य झाले. ■

पंतप्रधानांचे पूर्ण भाषण पाहण्यासाठी बाजूचा क्यूआर कोड स्कॅन करावा.






**लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स :** 13 जानेवारी 2023 रोजी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एम व्ही गंगा विलास या क्रूझ ला हिरवा झेंडा दाखवला होता. या क्रूझमधून जलमार्गाने हा वाराणसी ते दिब्रुगड प्रवास करता येतो. हा जगातील सर्वात मोठा, लांबचा नदी प्रवास होता. या दरम्यान, 5 भारतीय राज्ये आणि बांगलादेशातील 27 नदी प्रणालींमधून 3200 किमी अंतर पार करण्यात येते. या ऐतिहासिक प्रवासाला 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये प्रदीर्घ जलप्रवासाचा विक्रम होत असल्याबद्दल स्थान मिळाले आहे.

*मैप प्रतीकात्मक

## भारतामध्ये

# क्रूझ पर्यटनाची नवी पहाट

**सुमारे 7500 किमी लांबीचा किनारा आणि 20,000 किमी लांबीच्या जलमार्गांच्या जाळ्यासह, भारताकडे निसर्गाच्या या देणगीचा वापर करण्याची क्षमता आणि सामर्थ्य आहे. या विचाराने अशा शक्यतांना जन्म दिला ज्याद्वारे एकेकाळी भव्यता आणि विलास यांचे प्रतीक मानले जाणारे क्रूझ पर्यटन सामान्य माणसाशी जोडले गेले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी, आदरातिथ्य, मनोरंजन आणि संस्कृतीसह नवीन रोजगाराच्या संधी शोधण्यासाठी 5 वर्षांच्या विशेष लक्ष्यासह 'क्रूझ इंडिया मिशन' सुरु करण्यात आले.**

या 30 सप्टेंबर रोजी 'क्रूझ इंडिया मिशन'ला एक वर्ष पूर्ण होत आहे. चला तर जाणून घेऊया, भारतात क्रूझ पर्यटनाचे एक नवीन युग सुरू होत आहे...

एक काळ असा होता जेव्हा आपल्या देशातील नद्यांमधून मोठी जहाजे प्रवास करत असत, परंतु स्वातंत्र्यानंतर या क्षेत्राकडे दुर्लक्ष झाले. आता दशकांनंतर, एका नवीन दृष्टिकोनासह, नवभारत आपल्या वारशाला विकासाशी जोडून पुनरुज्जीवनाचा एक नवीन अध्याय लिहित आहे. गेल्या 11 वर्षांत, रस्ते, रेल्वे, हवाई मार्गांप्रमाणेच जलमार्गांवरही समांतर विकासाचे काम केले गेले आहे आणि आता हा मार्ग पुढे नेण्यासाठी, क्रूझ इंडिया मिशनद्वारे समुद्री प्रवास आणि नव भारताचा शोध सुरू करून देशाला जागतिक क्रूझ पर्यटन केंद्रात रूपांतरित करत आहे. पाच वर्षांत 10 सागरी क्रूझ टर्मिनल, 100 नदी क्रूझ टर्मिनल आणि 5 मरीना स्थापन करणे, हे या मिशनचे लक्ष्य आहे. गेल्या दशकाची तुलना केल्यास, समुद्री क्रूझ प्रवाशांची संख्या सुमारे 400 टक्क्यांनी वाढली आहे. 2047 पर्यंत ही संख्या 50 लाखांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास केंद्र सरकारला वाटतो आहे.

क्रूझ इंडिया मिशनच्या प्रवासात आतापर्यंत, 9 राज्यांना व्यापणाऱ्या 13 राष्ट्रीय जलमार्गांवर 15 रिव्हर क्रूझ सर्किट्स कार्यान्वित करण्यात आली आहेत. 14 राज्ये आणि 3 केंद्रशासित प्रदेशांमध्ये 51 रिव्हर-क्रूझ सर्किट्स कार्यान्वित करण्याची या मोहिमेची योजना आहे.




## असे वाढले क्रूझ पर्यटन आणि प्रवाशांची संख्या

2015 ते 2025 या काळात क्रूझने प्रवास करणा-यांची संख्या सुमारे 400% वाढली आहे. इतकेच नाही तर 2013-14 मध्ये तीन जलमार्गांवर फक्त 5 जहाजे होती, आता, 2024-25 मध्ये 13 राष्ट्रीय जलमार्गांवर नदी क्रूझ परिचालनात झपाट्याने वाढ झाली असून 25 जहाजे कार्यरत आहेत. 2014 मध्ये जलमार्गांची संख्या फक्त 5 होती, आज 24 राज्यांमध्ये 111 राष्ट्रीय जलमार्ग विकसित करण्याचे काम सुरू आहे.

## 2029 पर्यंत क्रूझ भारत मोहिमेची महत्त्वाची उद्दिष्टे

**4** लाख नोकऱ्या निर्माण करायच्या आहेत क्रूझ क्षेत्रात, सुरुवातीला 1 लाख आहेत.

**10** लाखांपर्यंत वाढवायची आहे समुद्री क्रूझ प्रवाशांची संख्या, सध्या ती 5 लाखांच्या आसपास आहे.

**15** लाखांपर्यंत वाढवायची आहे रिव्हर क्रूझ प्रवाशांची संख्या, सध्या ती 5 लाख आहे.

- 10 आंतरराष्ट्रीय क्रूझ टर्मिनल असतील, सध्या 2 आहेत.
- 100 रिव्हर क्रूझ टर्मिनल असतील, सध्या 50 आहेत.

“पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने सुद्धा जलमार्ग उपयुक्त आहेत. जलमार्गाने प्रवासामुळे पैसे देखील वाचतात. एका अभ्यासानुसार, जलमार्गाने वाहतुकीचा खर्च रस्त्याच्या तुलनेत अडीच पट कमी आहे, तर रेल्वेच्या तुलनेत तो एक तृतियांश कमी आहे. यावरून जलमार्गाने प्रवास केला तर किती इंधन वाचते, किती पैसे वाचतात याची तुम्ही कल्पना करू शकता.”

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

## क्रूझ भारत मोहीम 3 टप्प्यात राबवली जाणार

- पहिला टप्पा (ऑक्टोबर 2024 ते सप्टेंबर 2025): अभ्यास, मास्टर प्लॅनिंग, शेजारील देशांसोबत क्रूझ भागीदारीसह विद्यमान टर्मिनल्सचे आधुनिकीकरण करणे.
- दुसरा टप्पा (ऑक्टोबर 2025 ते मार्च 2027): नवीन क्रूझ टर्मिनल विकसित करण्याबरोबरच पर्यटनाच्या संधी असलेल्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे.
- तिसरा टप्पा (एप्रिल, 2027 ते मार्च, 2029): अखिल भारतीय क्रूझ सर्किटला उपखंडाशी जोडणे.

## क्रूझ पर्यटनाला चालना देण्यासाठी उचलली पावले

- बंदरावर फलाट उपलब्ध करून देण्यास प्राधान्य.
- बंदर शुल्क आणि प्रवासी शुल्काबाबत तर्कसंगत दर. बंदर शुल्कात 10% वरून 30% पर्यंत सवलत.
- परदेशी क्रूझचा ‘कॅबोटेज’ माफ करण्यात आला आहे, त्यामुळे भारतीय नागरिकांना एका भारतीय बंदरांमधून दुसऱ्या भारतीय बंदरात प्रवास करण्याची परवानगी मिळाली.
- ई-व्हिसा आणि व्हिसा ऑन अरायव्हल सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
- ई-लँडिंग कार्ड सुरू. क्रूझ प्रवासादरम्यान सर्व बंदरांवर वैध.
- सीमाशुल्क विभागाकडून जहाजांसाठी डिजिटल पध्दतीने शुल्क प्रक्रियेची सुरुवात.

इतर सुविधांबरोबरच अत्याधुनिक पायाभूत सुविधा प्रदान करणे आणि भारताला एक आकर्षक क्रूझ पर्यटन स्थळ बनवणे, हा यामागचा उद्देश आहे, जेणेकरून परदेशी पर्यटकांचा एक मोठा वर्ग भारताकडे आकर्षित होऊ शकेल. तसेच, भारतीय पर्यटकांमध्येही क्रूझ शिपिंग लोकप्रिय करता येईल. भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरणाने सुरू केलेल्या वाराणसी ते हल्दिया या राष्ट्रीय जलमार्ग क्रमांक-1 (1,390 किमी) वर अंतर्देशीय जहाजांची वाहतूक सुरूच आहे. गेल्या आर्थिक वर्षात, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमधून जाणाऱ्या या जलमार्गावरून 4,229 जहाजांनी प्रवास केला.

## देशातील 6 मुख्य बंदरांमध्ये क्रूझ टर्मिनल

देशातील 6 प्रमुख बंदरे - क्रूझ टर्मिनल आहेत - महाराष्ट्रातील मुंबई बंदर, गोव्यातील मुरगाव, केरळमधील कोची, तामिळनाडूतील चेन्नई, कर्नाटकातील नवमंगलम आणि आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम. तसेच, अंदमान आणि निकोबार बेटांमधील पुडुचेरी, लक्षद्वीप आणि श्री विजयपुरम येथे क्रूझ सुविधा आहेत. त्याचबरोबर 2024-25 या आर्थिक वर्षापर्यंत 11 राज्यांमध्ये 29 राष्ट्रीय जलमार्ग कार्यरत आहेत, त्यापैकी 3 राष्ट्रीय जलमार्ग केवळ क्रूझ वाहतुकीसाठी समर्पित आहेत.



# पीएम जनधन

# गरीबी विरुद्ध गरीबांना बनवले योद्धे



**"जेव्हा जन धन खाती उघडली गेली, तेव्हा ती फक्त बँक खाती नव्हती. त्यामुळे, बँकेचे दरवाजे आपल्यासाठीही उघडतात, याविषयीचा स्वाभिमान अनेकांना वाटू लागला. मी सुद्धा बँकेत जाऊन टेबलावर हात ठेवून बोलू शकतो, हा आत्मविश्वास आम्ही निर्माण केला आहे."**

79 व्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून उच्चारलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे शब्द बँक खात्यामुळे लोकांना मिळणाऱ्या स्वाभिमानाचे वर्णन करण्यासाठी पुरेसे आहेत. 2014 मध्ये सुरू झालेल्या या जनधन योजनेद्वारे आतापर्यंत 56 कोटीपेक्षा जास्त बँक खाती उघडण्यात आली आहेतच, परंतु त्यामुळे भारतातील कोट्यवधी नागरिकांसाठी विकास आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या नवीन संधींचे दरवाजेही उघडले आहेत...

अनेक दशकांपासून राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष आणि चुकीच्या धोरणांमुळे गरीबांना न्यूनगंडाने ग्रासले होते. गरीबांच्या नावाखाली बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले खरे, पण देशातील 40 टक्के लोकसंख्येसाठी बँकांचे दरवाजे बंदच होते. त्यांनी प्रत्येक अडचणीत मदत मागितली, प्रत्येक गरजेसाठी इतरांवर अवलंबून राहिले, समाजाने गरीबांना सरकारची जबाबदारी समजून त्यांच्याकडे पाठ फिरवली. बँक खाते, क्रेडिट कार्ड, विमा आणि पेन्शन यासारख्या गोष्टी फक्त श्रीमंतांसाठी आहेत, गरीबांसाठी नाहीत, असा समज होता. परंतु, पंतप्रधान जनधन योजनेद्वारे निराशेच्या या अंधारात पंतप्रधान मोदींनी आशेची एक नवीन मशाल पेटवली. गरीबांचे कधीही न पाहिलेले स्वप्न सत्यात उतरू लागले. बँक मित्र आणि बँक सखी ही मंडळी स्वतःहून गरीबांजवळ, प्रत्येक शहरात आणि गावात जाऊ लागले. जेव्हा गरीबांनी बँकेत त्यांचे शून्य जमा जन धन खाते उघडले तेव्हा त्यांचे जीवन बदलले. गरीब आणि वंचितांना जन धन खात्याचे पासबुक देऊन, पंतप्रधान मोदींनी त्यांना गरीबीविरुद्धच्या लढाईत योद्धा बनवले.

गरीबांना जन धन खात्यासह रूपे कार्ड मिळाले. अटल पेन्शन योजनेमुळे वृद्धापकाळात पेन्शनची सुरक्षा मिळाली. विमा आता श्रीमंतांचा विशेषाधिकार राहिलेला नाही. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेमुळे गरीब कुटुंबांना कठीण काळात विमा संरक्षण आणि मदतीची खात्री मिळाली आहे.

# बँक खाते एक, सुविधा देई अनेक

- आता पैसे स्वयंपाकघरातील डब्यात नाही तर बँकेत सुरक्षित आहेत. रुपे कार्डमुळे आर्थिक सुरक्षा आणि सुविधा दोन्ही मिळाल्या आहेत. आता आपण सावकारांच्या तावडीतून मुक्त झालो आहोत.
- 'बँक मित्र' द्वारे बँकिंग सेवा प्रत्येक घरात पोहोचत आहेत, ज्यामुळे लोकांना कोणत्याही अडचणीशिवाय आर्थिक मदत मिळत आहे.
- आता पेमेंटसाठी रोख रक्कम आवश्यक नाही, मोबाईल फोन पुरेसा आहे. युपीआयमुळे व्यवहार सोपे आणि सुरक्षित झाले आहेत.
- बचत वाढवण्याचे समीकरण: बँक ठेवी आणि सरकारकडून थेट लाभ हस्तांतरणामुळे, घरगुती बचत देखील वाढली आहे.
- वित्तीय समावेशन समीकरण: महिला खातेधारक + तळागाळातील महिलांना सक्षम बनवणारे जवळचे बँकिंग टच पॉइंट्स.
- सुशासनावरील विश्वासाचे समीकरण: जनधन खाती + आधार लिंकेज + मोबाईल ॲक्सेस या JAM त्रिसूत्रीने बँकिंगला देशाच्या तळागाळापर्यंत पोहोचवले आहे.
- JAM त्रिसूत्रीच्या माध्यमातून मध्यस्थांची हकालपट्टी : 320 पेक्षा जास्त योजनांच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी 45 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट नागरिकांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात आली. देशासाठी 4.3 लाख कोटी रुपयांची बचत झाली.

## बँकेपर्यंत पोहोचायचे समीकरण

बँक मित्र + डिजिटल बँकिंग युनिट = प्रत्येक गावात बँकिंग सुविधा.

- 21.6 लाखापेक्षा जास्त बँकिंग टच पॉइंट्ससह, भारताने 5 किमी परिघातील 6 लाखापेक्षा जास्त गावांना किंवा 99.9% गावांना बँकिंग सुविधा पुरवल्या आहेत.

युरोपियन युनियनच्या एकूण लोकसंख्येपेक्षा जास्त खाती आहेत.

**56.21**

कोटी जनधन खाती उघडण्यात आली.

**38.71**

कोटी रुपे डेबिट कार्ड जारी करण्यात आली

- 37.52 कोटी म्हणजेच 67 टक्क्यांहून अधिक बँक खाती ग्रामीण आणि निमशहरी भागातील बँकांमध्ये उघडण्यात आली.
- 18.69 कोटी लाभार्थी शहरी भागात
- 31.33 कोटी म्हणजे सुमारे 56% जनधन खाती महिलांची आहेत.





(टीप: 20 ऑगस्ट 2025 पर्यंतची आकडेवारी कोटींमध्ये)

> " वित्तीय बहिष्कारापासून सक्षमीकरणापर्यंत ! प्रधानमंत्री जन धन योजनेने संपूर्ण भारतातील जीवन बदलून टाकले आहे. सामाजिक उतरंडीमधला शेवटचा माणूस आर्थिकदृष्ट्या जोडला जातो तेव्हा संपूर्ण राष्ट्र एकत्र पुढे जाते. प्रधानमंत्री जन धन योजनेने हेच साध्य केले आहे. यामुळे लोकांचा सन्मान वाढला आहे आणि त्यांना स्वतःचे भविष्य निर्माण करण्याची क्षमता लाभली आहे."
>
> - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

जन धन योजना ही निश्चितच देशातील खऱ्या समाजवादाचे उदाहरण आहे. धर्म, जात आणि वर्ग अशा सर्व भेदभावांपासून मुक्त असलेल्या देशाच्या या यशस्वी योजनेने 'सबका साथ, सबका विकास' ही संकल्पना खऱ्या अर्थाने साकार केली आहे. अनेक दशकांपासून वंचित आणि शोषितांना त्यांचे हक्क मिळाले आहेत. देशात एक नवीन आत्मविश्वास निर्माण झाला आहे. आज गावांमध्ये पाच किलोमीटरच्या परिघात बँकिंग सेवा पोहोचत आहेत. लोक रुपे कार्ड सहजपणे वापरत आहेत. प्रत्येक गावात डिजिटल व्यवहार वाढले आहेत. हा फायदा सुरू ठेवण्यासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले आहे - "जन धन खाते असलेल्या प्रत्येक व्यक्तीने त्यांचे केवायसी पुन्हा करावे अशी मी विनंती करेन."

# अणुऊर्जेचा मुख्य स्तंभ होण्याच्या दिशेने भारताची आगेकूच

**जागतिक स्तरावर उर्जासंबंधी समस्या आणि पर्यावरणीय आव्हाने वाढत असताना, भारताने अणुऊर्जा हे शाश्वत विकासाचे एक शक्तिशाली माध्यम असल्याचे मान्य केले असून, या दिशेने जलद पावले उचलली आहेत. स्वदेशी तंत्रज्ञानाच्या विकासापासून ते आंतरराष्ट्रीय सहकार्यापर्यंत, भारत आता केवळ स्वावलंबी होत नाही तर जागतिक अणु नकाशावर आपले स्थान मजबूत करतो आहे. वर्ष 2047 पर्यंत 100 गिगावॅट अणुऊर्जा क्षमतेचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य गाठण्याचा केंद्र सरकारने केला आहे निर्धार...**

भारत अणुऊर्जा क्षमतेच्या संदर्भात वर्ष 2047 च्या उद्दिष्टासह ऊर्जेच्या संदर्भात अणुऊर्जेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. यामुळे ऊर्जा विश्वासार्हता सुनिश्चित होईल आणि जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी होईल. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केली जात आहे. स्वदेशी अणु तंत्रज्ञान आणि सार्वजनिक खाजगी भागीदारीवर भर देऊन धोरणात्मक बदल केले जात आहेत. ऊर्जा सुरक्षा आणि शाश्वतता साध्य करण्यासाठी अणुऊर्जा हा एक महत्त्वाचा घटक असल्याचे मान्य करत सरकारने विकसित भारतासाठी अणुऊर्जा अभियान सुरू केले आहे. देशांतर्गत अणु क्षमता वाढवणे, खाजगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन देणे आणि लहान मॉड्यूलर सारख्या प्रगत अणु तंत्रज्ञानाच्या वापराला गती देणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.



वित्तीय वर्ष 2025-26 च्या अर्थसंकल्पात सरकारने अणुऊर्जा मिशन सुरू केले आहे. यामध्ये लघु मॉड्यूलर रिऍक्टरच्या संशोधन आणि विकासावर भर दिला आहे. या उपक्रमासाठी सरकारने 20,000 कोटी रुपये मंजूर केले असून 2033 पर्यंत किमान पाच स्वदेशी रचना असलेले आणि कार्यक्षम लघु मॉड्यूलर रिऍक्टर विकसित करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. हे मिशन 2047 पर्यंत 100 गीगावॅट अणुऊर्जा क्षमता प्राप्त करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेशी सुसंगत आहे. हे उद्दिष्ट कार्बन उत्सर्जन कमी करण्यात आणि भविष्यातील ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यात महत्त्वाचा टप्पा ठरेल. याचबरोबर, केंद्र सरकार अणुऊर्जा मिशनची अंमलबजावणी सुलभ व्हावी यासाठी अणुऊर्जा अधिनियम आणि अणुऊर्जा अपघातातील नागरी जबाबदारी अधिनियम यामध्ये सुधारणा करण्याचा विचार करत आहे. या सुधारणांमुळे अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल अशी अपेक्षा आहे.

### या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी खासगी क्षेत्राशी भागीदारी

- भारतात लघु रिऍक्टरची स्थापना
- भारतात लघु मॉड्यूलर रिऍक्टरवर संशोधन आणि विकास
- अणुऊर्जेसाठी नव्या तंत्रज्ञानाचा संशोधन आणि विकास

अणुऊर्जा विभागाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह म्हणाले की,डॉ. होमी जहांगीर भाभा यांनी सुरू केलेल्या भारताच्या अणुऊर्जा प्रवासाला आंतरराष्ट्रीय प्रतिबंधात्मक धोरणे आणि अण्वस्त्र प्रसाराबाबतच्या चुकीच्या शंका यामुळे देशांतर्गत तसेच जागतिक स्तरावर अनेकदा अविश्वासाचा सामना करावा लागला. मात्र, 2014 पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतात मोठा बदल घडला असून स्वच्छ आणि शाश्वत वीज निर्मितीचा एक महत्त्वाचा घटक म्हणून

## अणुऊर्जा क्षेत्रात अलीकडे झालेला विकास....

- भारताची सर्वात जुनी युरेनियम खाण, जादूगोड़ा खाण :विद्यमान खाण पट्ट्यात आणि त्याच्या आसपास नवीन साठ्यांचा महत्त्वपूर्ण शोध लागला आहे. त्यामुळे या खाणीचे आयुष्य 50 वर्षांपेक्षा जास्त वाढणार आहे.
- 700 मेगावॅट क्षमतेचे पी.एच.डब्ल्यू.आरची पहिली दोन संयंत्रे : वित्तीय वर्ष 2023-24 मध्ये या संयंत्रांनी व्यावसायिक स्वरूपात कार्य सुरू केले आहे.
- देशाचा पहिला प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिऍक्टर (पीएफबीआर – 500 मेगावॅट):सन 2024 मध्ये अनेक महत्त्वपूर्ण टप्पे गाठले गेले. यामध्ये प्रमुख आहेत सोडियम भरणे, भरलेल्या सोडियमचे शुद्धीकरण करणे, सर्व चार सोडियम पंप (2 प्राथमिक सोडियम पंप आणि 2 द्वितीयक सोडियम पंप) कार्यान्वित करणे.
- एनपीसीआयएल आणि एनटीपीसी : देशातील अणुऊर्जा सुविधा विकसित करण्यासाठी पूरक संयुक्त उपक्रम करार करण्यात आला आहे.
- या करारामुळे, 4 x 700 मेगावॅट क्षमतेचे पीएचडब्ल्यूआर युनिट्स असलेला 'माही-बांसवाडा, राजस्थान अणुऊर्जा प्रकल्प' यासह अणुऊर्जा प्रकल्पांचे बांधकाम, मालकी हक्क आणि संचालन केले जाणार आहे.



# भारतातील नवीन नवीकरणीय ऊर्जा क्षेत्राची वैशिष्ट्ये

## विक्रमी निर्मिती क्षमता

**234.24**

गीगावॅट ( 8.78 गीगावॅट अणुऊर्जा वगळून) 12 ऑगस्ट 2025 पर्यंत भारताची एकूण नवीकरणीय ऊर्जा क्षमता

**500**

गीगावॅट बिगर-जीवाश्म ऊर्जा क्षमता वर्ष 2030 पर्यंत निर्माण करण्याचे भारताचे उद्दिष्ट. या उद्दिष्टाच्या दिशेने भारत वेगाने प्रगती करत आहे.

- **जलविद्युत क्षमता**

  12 ऑगस्ट 2025 पर्यंत मोठी जलविद्युत क्षमता 49.62 गीगावॅट, तर लहान जलविद्युत क्षमता 5.10 गीगावॅट

- **पवन ऊर्जा क्षमता**

  12 ऑगस्ट 2025 पर्यंत 51.67 गीगावॅट

### जागतिक क्रमवारी

एकूण नवीकरणीय ऊर्जा क्षमतेत आणि पवन ऊर्जा उत्पादनात भारताचा जगात चौथा, तर सौर ऊर्जा उत्पादनात जगात तिसरा क्रमांक आहे.





### सौर ऊर्जा क्षमता

12 ऑगस्ट 2025 पर्यंत 116.24 गीगावॅट. भारताच्या एकूण नवीकरणीय ऊर्जेमध्ये सौर ऊर्जेचा वाटा सुमारे 48% आहे.

## पीएम-सूर्य घर-मोफत वीज योजना

एक कोटी कुटुंबांना लाभ देण्यासाठी 75,021 कोटी खर्च करून ही योजना सुरू करण्यात आली आहे. 14 ऑगस्ट 2025 पर्यंत एकूण 58.81 लाख अर्ज प्राप्त झाले आहेत. आतापर्यंत 17.24 लाख कुटुंबांना या योजनेचा थेट लाभ मिळाला आहे. कुटुंबांना मदत म्हणून एकूण 9,841.77 कोटींचे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

## अणुऊर्जा (वीज) उत्पादनात 60% नी वाढ



2014-15
**35,592**
दशलक्ष युनिट

2024-25
**56681**
दशलक्ष युनिट

### सध्या असलेली विद्युत उत्पादन क्षमता

71% वाढ: 2014 मध्ये भारतातील 25 अणुभट्ट्यांची क्षमता 4,780 मेगावॅट होती. ती 2025 मध्ये वाढून 8,780 मेगावॅट झाली आहे.

अणुऊर्जा कार्यक्रमाला अधिक स्वीकारार्हता मिळाली आहे. डॉ. सिंह यांनी सांगितले की 100 गीगावॅट अणुऊर्जेचे उद्दिष्ट जाहीर केल्यानंतरही कोणताही नकारात्मक परिणाम झाला नाही. यामुळे जागतिक स्तरावर भारताची विश्वासार्हता आणि जबाबदार, पारदर्शक दृष्टिकोन, यांना मान्यता मिळत असल्याचे दिसून येते.

### अणुऊर्जा उत्पादन क्षमता वाढवण्यासाठीची पावले

भारत, ऊर्जेच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि पर्यावरणीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अणुऊर्जा क्षमता सक्रीयपणे वाढवत आहे. सरकारने 2031-32 वर्षापर्यंत अणुऊर्जा क्षमता 8,180 मेगावॅटवरून 22,480 मेगावॅटपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गुजरात, राजस्थान, तमिळनाडू, हरियाणा, कर्नाटक आणि मध्यप्रदेश येथे मिळून 8,000 मेगावॅट क्षमतेचे 10 अणुभट्टी प्रकल्प उभारणे आणि कार्यान्वित करणे अपेक्षित आहे.

# मागील 11 वर्षांत सुरू झालेल्या नव्या अणुभट्ट्या

**डिसेंबर 2014**
कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्प (केकेएनपीपी) युनिट-1
**1,000** मेगावॅट

**मार्च 2017**
कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्प (केकेएनपीपी) युनिट-2
**1,000** मेगावॅट

**जून 2023**
काकरापार अणुऊर्जा प्रकल्प (केएपीपी) युनिट-3
**700** मेगावॅट

**मार्च 2024**
काकरापार अणुऊर्जा प्रकल्प (केएपीपी) युनिट-4
**700** मेगावॅट

**एप्रिल 2025**
राजस्थान अणुऊर्जा प्रकल्प (आरएपीपी) युनिट-7
**700** मेगावॅट



"नागरी वापरासाठीची अणुऊर्जा भविष्यात देशाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देईल.

\- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

सरकारने आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यातील कोव्वाडा येथे, अमेरिकेच्या सहकार्याने 6 x 1208 मेगावॅट क्षमतेचा अणुऊर्जा प्रकल्प उभारण्यास तत्त्वतः मंजुरी दिली आहे. याशिवाय इतर काही रिॲक्टरवरही काम सुरू करण्यात आले आहे. भारताचे अणुऊर्जा प्रकल्प कडक सुरक्षा नियमावली अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली चालवले जातात. भारतीय अणुऊर्जा प्रकल्पांमधील किरणोत्सर्गाचे प्रमाण नेहमीच जागतिक मानकांपेक्षा कमी असते. यातून देशाची सुरक्षित आणि टिकाऊ अणुऊर्जा क्षमतेबद्दलची वचनबद्धता दिसून येते.

देशाला ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकार अनेक प्रभावी आणि दूरगामी उपक्रम राबवत आहे. त्याअंतर्गत गेल्या 11 वर्षांत सौरऊर्जेत 30 पट वाढ झाली आहे. मिशन ग्रीन हायड्रोजनसाठी, भारत हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करत आहे. भारत 2047 पर्यंत अणुऊर्जा क्षमता 10 पट वाढवण्याच्या संकल्पासह पुढे जात आहे. सरकारच्या धोरणांमुळे भारताने 2025 मध्येच 50% स्वच्छ ऊर्जा लक्ष्य पूर्ण केले आहे. हे मूळ 2030 च्या लक्ष्यापेक्षा 5 वर्षे आधी पूर्ण केले आहे.



## केंद्रीय कायदेमंडळाचे पहिले भारतीय अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांच्या निवडीला 100 वर्षे पूर्ण

# लोकशाहीचे इंजिन आहे संसद

येथेच चांगल्या परंपरा निर्माण होतात, देशहिताच्या धोरणांची आखणी होते, कायदे तयार होतात आणि राष्ट्राची दिशा ठरते. या प्रक्रियेत सभागृहाच्या अध्यक्षांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अध्यक्षपदाची प्रतिष्ठा, नि:पक्षपातीपणा आणि न्याय या स्तंभांवर टिकलेली आहे. अशा प्रतिष्ठीत व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या विठ्ठलभाई पटेल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, दिल्ली विधानसभा येथे दोन दिवसीय अखिल भारतीय विधानसभा अध्यक्ष परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले.

महान क्रांतिकारक विठ्ठलभाई पटेल यांच्या कार्यकाळात केंद्र सरकार आणि सर्व राज्यांमध्ये विधायी विभाग (कायदे तयार करून त्यांचे व्यवस्थापन करणारा विभाग) आणि विधानसभा सचिवालयाची स्थापना झाली. त्यावेळी त्यांनी स्पष्ट सांगितले होते की कोणतीही विधानसभा निवडून आलेल्या सरकारच्या अधीन काम करू शकत नाही... विधानसभा स्वतंत्र असली पाहिजे, तेव्हाच तेथे होणारी चर्चा अर्थपूर्ण ठरते. याची आठवण करून देत केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी 24 ऑगस्ट रोजी झालेल्या परिषदेत सांगितले की ही आपल्यासाठी अतिशय महत्त्वाची वेळ आहे. आपण सभापतीपदाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी काम केले पाहिजे. आपल्या राज्यातील जनतेच्या मतासाठी एक निष्पक्ष मंच उभा केला पाहिजे. सरकारी पक्ष आणि विरोधी पक्षांनी निष्पक्ष चर्चा व्हावी याची काळजी घ्यावी. सभागृहाचे कामकाज, विधानसभा, लोकसभा आणि राज्यसभेच्या नियमांप्रमाणे चालले पाहिजे. लोकशाहीत विचारमंथन हाच जनतेच्या समस्या सोडवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.



## लोकशाही केली अधिक बळकट

- महान स्वातंत्र्यसैनिक विठ्ठलभाई पटेल यांची ऑगस्ट 1925 मध्ये केंद्रीय विधानसभेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. यामुळे भारतीयांनी घडवलेल्या विधायी इतिहासाची (कायदे बनवण्याचा इतिहास) सुरुवात झाली.
- भारतीय विचारांच्या आधारे, लोकशाही पद्धतीने देश चालवण्याची पायाभरणी त्यांनी केली.
- त्यांनी केंद्र सरकार आणि सर्व राज्यांमध्ये विधायी विभाग आणि विधानसभा सचिवालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय संविधानसभेनेही मान्य केला.
- विठ्ठलभाई पटेल यांनी अनेक परंपरा सुरू केल्या. विशेषतः विधायी (कायदे बनवण्याचे) कामकाज आणि सभापतींच्या जबाबदाऱ्या याबाबतच्या त्यांच्या परंपरा आजही दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करतात.
- त्यांच्या कार्यकाळात त्यांची परीक्षा घेणारे अनेक प्रसंग आले, पण त्या सर्वांत ते यशस्वी ठरले.
- त्यांनी कधीही कायदेमंडळाच्या अध्यक्षपदाची प्रतिष्ठा कमी होऊ दिली नाही आणि सभागृहाचा वापर, देशाचा आवाज दडपण्यासाठी होऊ दिला नाही. तसेच, विठ्ठलभाई पटेल यांनी इंग्रजांच्या मानसिकतेचा दबाव विधानसभेच्या कामकाजावर कधीच पडू दिला नाही.

"

विठ्ठलभाई पटेल यांनी विधायी (कायदेनिर्मिती) परंपरांची पायाभरणी करून भारतीय लोकशाहीला बळकटी दिली. विधानसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी केवळ सभागृहाची प्रतिष्ठा टिकवली नाही, तर प्रत्येक सदस्याला बोलण्याचा पूर्ण अधिकार देऊन लोकशाही मूल्यांचे आदर्श उदाहरण समोर ठेवले. ते सर्व विधानसभा अध्यक्षांसाठी प्रेरणास्थान आहेत. आज प्रत्येक विधानसभा अध्यक्षाचे कर्तव्य आहे की त्यांनी निष्पक्ष, सकारात्मक आणि विधायक चर्चेला प्रोत्साहन द्यावे, जेणेकरून देशातील प्रत्येक घटकाचे हितसंबंध सुरक्षित राहतील.

– अमित शहा, केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री



## दिल्ली विधानसभा परिसरात चालायची केंद्रीय विधानसभा

ब्रिटिश काळात 1919 च्या कायद्याअंतर्गत शाही विधान परिषदेचा विस्तार करण्यात आला आणि द्विसदनी विधिमंडळ सुरू झाले. कनिष्ठ सभागृह म्हणजे केंद्रीय विधानसभा, ज्यात एकूण 144 सदस्य होते. त्यापैकी 104 निवडून आलेले आणि 40 नियुक्त सदस्य होते. ही केंद्रीय विधानसभा सध्याच्या दिल्ली विधानभवनातून चालवली जात होती. ऑगस्ट 1925 मध्ये महान स्वातंत्र्य सैनिक विठ्ठलभाई पटेल केंद्रीय विधानसभेचे पहिले भारतीय अध्यक्ष झाले. या सभागृहात भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील अनेक थोर नेते सदस्य म्हणून सहभागी झाले आणि त्यांनी जनतेच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा सभागृहात मांडल्या. 14 ऑगस्ट 1947 रोजी केंद्रीय विधानसभा आणि राज्य परिषद यांचे अस्तित्व संपुष्टात आले.

सभागृहांनी जेव्हा-जेव्हा आपली प्रतिष्ठा गमावली, तेव्हा-तेव्हा देशाला वाईट परिणाम भोगावे लागले आहेत. देशहितासाठी जनतेचा आवाज पोहोचवण्याचे माध्यम बनणे, यातच सभागृहांची खरी प्रतिष्ठा आहे.

भारतात सभापतीला एक स्वतंत्र संस्था मानले गेले आहे. सभागृहातील सर्वात कठीण भूमिका ही सभापतीची असते. ते एखाद्या पक्षाचे सदस्य म्हणून निवडून येतात, पण शपथ घेतल्यावर निष्पक्ष पंच म्हणून काम करतात. गेल्या सुमारे 80 वर्षांत भारताने लोकशाहीची पाळेमुळे अतिशय खोलवर रुजवली आहेत. भारतीय जनतेच्या नसानसात लोकशाही खेळते आहे, हे हे सिद्ध केले आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री यांनी सांगितले की स्वातंत्र्यानंतर भारतात अनेकदा सत्तांतर झाले, पण ते नेहमीच शांततामय पद्धतीने आणि रक्तपाताशिवाय झाले. यामागचे मुख्य कारण म्हणजे आपण आपली कायदेनिर्मिती प्रक्रिया नीट जपली आणि काळानुरूप त्यात आवश्यक ते बदल केले.

संसद आणि विधानसभांमध्ये उपयुक्त, रचनात्मक चर्चा (वाद-प्रतिवाद) झाल्या नाहीत, तर या संस्था केवळ रिकाम्या, निर्जीव इमारतीसारख्या ठरतील, असे केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी म्हटले आहे. केवळ राजकीय फायद्यासाठी संसद किंवा विधानसभेचे कामकाज होऊ न देणे, हा विधायक वाद-प्रतिवाद नव्हे. विरोध हा संयमपूर्ण असला पाहिजे. विरोधाच्या नावाखाली दररोज आणि पूर्ण सत्रच ठप्प पाडण्याची जी परंपरा तयार होत आहे, त्यावर देशातील जनता आणि निवडून आलेले प्रतिनिधी यांनी गंभीर विचार केला पाहिजे. ■

केंद्रीय गृहमंत्र्यांचे संपूर्ण भाषण पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

# बिहारच्या
## राजकारणातील निर्लेप व्यक्तिमत्व



जन्म : 21 सप्टेंबर 1914
मृत्यु : 9 सप्टेंबर 1984

**सत्य, निष्ठा, साधेपणा आणि त्याग यांचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या भोला पासवान शास्त्री यांनी बिहारच्या राजकारणात दिलेल्या योगदानाचे आजही स्मरण केले जाते. अत्यंत गरीब कुटुंबात जन्मलेल्या भोला पासवान शास्त्री यांना "बिहार की राजनीति का विदेह" म्हटले गेले, कारण त्यांनी शून्यापासून शिखरापर्यंतचा प्रवास प्रामाणिकपणे केला. संस्कृत ही फक्त उच्च वर्णीयांची भाषा मानली जात होती, तेव्हा त्यांनी या भाषेतून शिक्षण घेतले. स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होऊन तुरुंगवास भोगणारे शास्त्री, तीन वेळा बिहारचे मुख्यमंत्री झाले, पण त्यांचे संपूर्ण आयुष्य गरिबीतच गेले. तरीदेखील त्यांनी आपले चारित्र्य स्वच्छ ठेवले, त्यावर एकही डाग पडू दिला नाही.**

बिहारच्या मातीसारखे साधे आणि प्रामाणिक असलेले भोला पासवान शास्त्री हे असे व्यक्ती होते ज्यांना राज्याचे पहिले दलित मुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला. शेतकरी आणि मजूर यांच्यासाठी आपले जीवन समर्पित करणारे शास्त्री इतके साधे होते की मंत्री किंवा मुख्यमंत्री असतानाही ते अनेक वेळा आरामात झाडाखाली बसून काम करीत. असेही सांगितले जाते की ते जमिनीवर कांबळ पसरवून त्यावर बसण्यात कधीही संकोच करत नसत आणि अधिकाऱ्यांबरोबरच्या बैठकाही तिथेच घेऊन निर्णय घेत. सांसारिक सुखसुविधांपासून दूर राहून देश आणि समाजाच्या कामात सतत मग्न राहण्यामुळे त्यांना 'बिहारच्या राजकारणातील कर्मयोगी' असेही म्हटले जाते.

भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते आणि देशवासीयांच्या मनामध्ये स्वातंत्र्याची ज्वाला तळपू लागली होती, त्यावेळी पूर्णिया जिल्ह्यातील बैरगाछी येथे 21 सप्टेंबर 1914 रोजी भोला पासवान शास्त्री यांचा जन्म झाला. ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रभावाखाली स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले. त्यांनी मेहनत आणि चिकाटीने बनारसमध्ये संस्कृतचे शिक्षण पूर्ण केले आणि शास्त्री ही पदवी मिळवली, त्यामुळे त्यांचे नाव भोला पासवान शास्त्री असे झाले. ते बुद्धिमान तसेच विद्वान होते आणि त्यांच्या विद्वत्तेची इतरांवर खूप छाप पडत असे. नंतर त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याही विचारांचा प्रभाव दिसू लागला.

भोला पासवान शास्त्री पहिल्यांदा 1968 मध्ये बिहारचे मुख्यमंत्री झाले, पण ते फक्त तीन महिने या पदावर राहिले. त्यानंतर 1969 मध्ये सुमारे 13 दिवस आणि 1971 मध्ये 7 महिने ते पुन्हा मुख्यमंत्री झाले. राज्यातील राजकारणाबरोबरच ते केंद्र सरकारच्या राजकारणातही सक्रीय होते. विविध पदांवर असतानाही महिन्याचे वेतन हेच त्यांचे उत्पन्न होते. त्यांच्याकडे स्वतःचा आलीशान बंगला किंवा कार नव्हती. त्यांचे बालपण झोपडीमध्ये गेले आणि शेवटचे दिवसही त्यांनी झोपडीतच व्यतीत केले. असेही सांगितले जाते की, 9 सप्टेंबर 1984 रोजी त्यांच्या निधनाच्या वेळी त्यांचे अंत्यसंस्कार व्यवस्थित पार पडू शकतील एवढेही पैसे त्यांच्या कुटुंबाजवळ नव्हते.

10 मार्च 2014 रोजी पूर्णियामधील रॅलीत तेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भोला पासवान शास्त्री यांचे स्मरण करून त्यांना वंदन केले. तसेच, 23 सप्टेंबर 2022 रोजी बिहारच्या पूर्णियामध्ये झालेल्या जन भावना महासभेत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी भोला पासवान शास्त्री यांचे स्मरण करत सांगितले की, पूर्णिया जिल्ह्याने मुख्यमंत्री भोला पासवान शास्त्री यांच्या रुपात बिहारला पहिला दलित मुख्यमंत्री दिला. ■







PMO India
@PMOIndia

सणासुदीला जी खरेदी करू, जी भेटवस्तू देऊ...
सजावटीसाठी जे सामान आणू...
ते भारतात बनवलेले असले पाहिजे.




Rajnath Singh
@rajnathsingh

तंत्रज्ञान आणि अनपेक्षित हल्ले यांच्या मिश्रणामुळे आजकालची युद्धे अधिक गुंतागुंतीची आहेत. त्यात काय होईल याचा अंदाज करता येत नाही. म्हणूनच आपल्याला फक्त विद्यमान तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवून भागणार नाही, तर नवनवीन शोध आणि अचानक येणाऱ्या आव्हानांसाठी सतत तयार राहावे लागेल.

Amit Shah
@AmitShah

130 व्या संविधान दुरुस्ती विधेयकात मुख्यमंत्री आणि मंत्र्यांबरोबर पंतप्रधानही असावा, असा बदल मोदीजींनी स्वतः घडवून आणला आहे.

एखादा मुख्यमंत्री तुरुंगात आहे आणि सचिव, पोलीस महासंचालक, मुख्य सचिव यांना तुरुंगात जाऊन त्याच्याकडून आदेश घ्यावे लागत आहेत, हे आपल्या लोकशाहीला शोभणारे नाही.

संविधान तयार झाले तेव्हा भविष्यकाळात तुरुंगात राहून कुणी सरकार चालवेल, या निर्लज्जपणाची संविधान निर्मात्यांनी कल्पनाही केली नव्हती.







Nitin Gadkari
@nitin_gadkari

11 वर्षांपूर्वी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांनी जन धन योजनेद्वारे आर्थिक सबलीकरणाचे बीज रोवले. आज बँकांमध्ये 56 कोटींपेक्षा जास्त खाती उघडली गेली असून महिलांनी त्यात आघाडी घेतली आहे. गावे देशाच्या आर्थिक प्रवाहाशी जोडली गेली आहेत. प्रधानमंत्री जन धन योजना (PMJDY) ही आता केवळ बँकिंगपुरती मर्यादित नाही, तर ती आहे कृतीतला विश्वास, प्रत्येक पैशाच्या बटव्यातील सन्मान आणि प्रत्येक घरातील सबलीकरण. जी योजना सुरुवातीला आर्थिक समावेशनाचे स्वप्न होती, ती आज भारताच्या आर्थिक क्रांतीचे प्रतीक बनली आहे.

Jagat Prakash Nadda
@JPNadda

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले नवे आरोग्य धोरण हे एक सर्वंकष धोरण आहे. यात पहिल्यांदाच प्रतिबंध, आरोग्यवर्धन आणि उपचार या तिन्ही गोष्टींवर भर दिला गेला आहे. म्हणजे माणूस आजारीच पडू नये, याची आपण काळजी घ्यायची आहे.

Dr Jitendra Singh
@DrJitendraSingh

भारतीय अंतराळ संशोधन संस्था #ISRO ने यशस्वीपणे पहिले इंटिग्रेटेड एअर ड्रॉप टेस्ट (IADT-01) केले आहे. यात #Gaganyaan मोहिमेसाठी वापरल्या जाणाऱ्या पॅराशूट आधारित गती कमी करणाऱ्या प्रणालीचे प्रदर्शन करण्यात आले.

इस्रो, भारतीय हवाई दल, डीआरडीओ, भारतीय नौदल आणि तटरक्षक दल यांनी मिळून हे साध्य केले.


एससीओ शिखर सम्मेलन में प्रधानमंत्री मोदी का दिखा जलवा

रोबोट स्योखा खींचा सबका ध्यान

मोदी ने उठाया आतंकवाद का मुद्दा

एससीओ की बैठक • प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सात साल बाद चीन पहुंचे, राष्ट्रपति शी जिनपिंग से मिले

चीन में मोदी से बोले जिनपिंग...

हमारी मजबूत दोस्ती ही राइट चॉइस

मोदी की दो टूक... सीमा पर शांति दोनों देशों के बीच रिश्तों की इंफ्रास्ट्रक्चर पॉलिसी

एससीओ में आज... पीएम मोदी रूसी राष्ट्रपति पुतिन से मिलेंगे, अहम मुद्दों पर चर्चा होगी

मोदी-जिनपिंग ने ट्रम्प को बता दिया कि दुनिया उनकी धुन पर नहीं नाचती है...

विशेषज्ञ की राय | कहा, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी-शी वार्ता के बाद विदेश मंत्रालय के बयान में दो बातें ऐसी बताई जो पहले कभी नहीं हुई

मोदी ने तियानजिन से दुनिया को दिया बड़ा संदेश

पोलित ब्यूरो सदस्य से मुलाकात महत्वपूर्ण

'चीन से संबंध सुधरना सही'

अप्रत्यक्ष रूप से अमेरिका को संकेत

कई ठोस प्राथमिकताओं का जिक्र


कई देशों के राष्ट्राध्यक्षों से मिले PM नरेंद्र मोदी

मालदीव के राष्ट्रपति मोहम्मद मुइज्जू (Muizzu) से भेंट हुई। दोनों देशों के बीच विकासात्मक सहयोग हमारे लोगों के लिए लाभकारी है।

बेलारूस के राष्ट्रपति अलेक्जेंडर लुकाशेंको (Aleksandr Lukashenko) से मुलाकात कर खुशी हुई। आने वाले समय में सहयोग को लेकर हम दोनों आशावादी हैं।

कजाखस्तान (Kazakhstan) के राष्ट्रपति तोकायेव (Tokayev) के साथ अच्छा विचार विमर्श हुआ। दोनों देश ऊर्जा, सुरक्षा, स्वास्थ्य सेवा और फार्मा सहित कई अहम क्षेत्रों में मिलकर से कार्य कर रहे हैं।

इजिप्ट (Egypt) के प्रधानमंत्री मोस्तफा मादबौली (Mostafa Madbouly) से भेंट हुई। कुछ साल पहले की अपनी इजिप्ट यात्रा को याद किया। भारत-मिस्र दोस्ती नई ऊंचाइयों पर है।

नेपाल के प्रधानमंत्री के.पी. ओली से मुलाकात कर प्रसन्नता हुई। भारत और नेपाल के संबंध गहरे और अटूट मित्रता है।


चेतेश्वर पुजारा टेस्ट क्रिकेट की खूबसूरती की याद दिलाते थे : मोदी

फाइल फोटो

प्रधानमंत्री बुलेट ट्रेन से मियागी पहुंचे, जापानी पीएम इशिबा संग 300 किलोमीटर का सफर किया

जापान से रिश्तों को रफ्तार मिलेगी: मोदी

टोक्यो में शुक्रवार को प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी के दौरे पर तिरंगी रोशनी में जगमगाता जापान का सबसे ऊंचा टावर, टोक्यो स्काई ट्री। • एएनआइ

चांद के दक्षिणी ध्रुव के राज मिलकर खोलेंगे इसरो और 'जाक्सा' के वैज्ञानिक

मिशन चंद्रयान-5 के लिए भारत और जापान मिलकर काम करेंगे

समझौता

# स्थूलत्वापासून मुक्ती...

# एक आव्हान

स्थूलत्व ही एक मोठी समस्या असून अनेक रोगांचे मूळ आहे. त्यामुळे देशातील नागरिकांना आपले कुटुंब मानणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या बुरूजावरून, स्थूलत्वापासून मुक्त होण्याचे आवाहन केले. स्वच्छता, आत्मनिर्भर भारत यांसारख्या उपक्रमांबरोबरच त्यांनी आता आरोग्यासाठीही जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी, प्रत्येक कुटुंबाने स्वयंपाकात तेलाचे प्रमाण 10% कमी करावे, असे सुचवले आहे. कारण निरोगी भारतच विकसित भारताचा खरा आधारस्तंभ ठरेल.



- एका अभ्यासानुसार, आजच्या घडीला दर आठपैकी एक व्यक्ती स्थूलत्वाच्या समस्येने त्रस्त आहे. येत्या काही वर्षांत हा आकडा वाढून दर आठपैकी तिसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे.
- राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण-5 च्या निष्कर्षानुसार, देशातील 24% महिला आणि 23% पुरुष हे अधिक वजनाचे किंवा स्थूल आहेत.
- जागतिक आरोग्य संघटनेच्या 2022 मधील आकडेवारीनुसार, जगभरात जवळपास 2.5 अब्ज (अडीचशे कोटी) लोक अधिक वजनाचे होते. म्हणजेच, त्यांचे वजन आवश्यकतेपेक्षाही खूप जास्त होते.



"

आपल्याला आपल्या सामर्थ्याचा विस्तार करायचा असेल, तर सर्वप्रथम आपली तंदुरुस्ती आणि आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. तंदुरुस्ती वाढवण्यासाठी आणि स्थूलपणा कमी करण्यासाठी माझा एक सल्ला तुम्हाला आठवतोय ना! खाण्यात 10% तेल कमी करा, स्थूलत्व कमी करा. तुम्ही तंदुरुस्त असाल, तेव्हाच जीवनात अधिक यशस्वी व्हाल.

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELMAR/2020/78830, 16-30 सितम्बर, 2025

आरएनआय DELMAR/2020/78830, दिल्ली पोस्टल लायसन्स नंबर- DL (S)-1/3553/2023-25 डब्ल्यू पी पी क्रमांक - U (S)-101/2023-25, पोस्टिंग अँट बीपीसी, मार्केट रोड, नवी दिल्ली - 110001, 13-17 अग्रीम पाक्षिक (प्रकाशनाची तारीख - 2 सितम्बर 2025, एकून पाने-52)

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा, मुख्यमहासंचालक,
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक आणि मुद्रक:
कंचन प्रसाद , महासंचालक,
केंद्रीय संचार ब्युरो

खोली क्र.– 278, केंद्रीय संचार ब्युरो,
माहिती भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली – 110003 येथून प्रकाशित

मुद्रण:
चन्दु प्रेस, 469, पटपड़गंज इंडस्ट्रियल एस्टेट,
दिल्ली–110092

Marathi